सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. २९ नोव्हेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २३३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# निवडणुका होणार, स्थगिती नाही

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याच्या आक्षेपावर आज शुक्रवारी पुन्हा सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण तीन न्यायाधीशांकडे सुनावणीसाठी पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच पुढील सुनावणी २१ जानेवारीला ठेवण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांना स्थगिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. २८८ नगरपरिषदा,नगरपंचायतींच्या निवडणुका घोषणेप्रमाणे होणार आहे. ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या निवडणुका आदेशाधीन राहणार, असं सर्वोच्च न्यायालयाने सांगितलं आहे.

राज्यातील ४० नगरपरिषदा आणि १७ नगरपंचायतींमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेल्याची कबुली राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात दिली होती. त्यानंतर आज सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित सुनावणी पार पडली.

सर्वोच्च न्यायालयाने आजच्या सुनावणीत म्हटलं आहे की, 'मनपा, जि.प आणि पं.समित्यांच्या निवडणुकांना विलंब नको व्हायला. आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्था. स्व.संस्थांच्या निवडणुका आमच्या आदेशाधीन आहेत. त्यामुळे पुढील सुनावणी २१ जानेवारीला असेल आणि त्यावेळी तीन न्यायमूर्तींचं खंडपीठ असेल', असंही न्यायालयाने स्पष्ट केलं आहे.

तसेच, 'राज्यातील २४७ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायती अशा २८८ स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये होत असलेल्या निवडणुका घोषित झाल्याप्रमाणे होऊ द्या. कोणत्याही निवडणुकांना आम्ही स्थगिती देत नाहीयत.

**निकाल अंतिम निकालाच्या अधीन : सरन्यायाधीश**

मागील सुनावणीत दिलेल्या आदेशाच्या संदर्भात, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने एक संक्षिप्त नोंद सादर केली होती. फक्त ४० नगरपरिषदा आणि १७ नगरपंचायत आहेत जिथे आरक्षण ५० टक्क्यांहून अधिक आहे. जे मुद्दे निर्माण होऊ शकतात ते विचारात घेऊन जानेवारी २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यात ३ न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर प्रकरण सूचीबद्ध करावं. दरम्यान, नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या निवडणुका अधिसूचित वेळापत्रकानुसार होऊ शकतात परंतु वरील ४० आणि १७ चे निकाल या कार्यवाहीच्या अंतिम निकालाच्या अधीन असतील.

बांठिया आयोगाचा अहवाल आम्हीही वाचला नाही, पण सध्या त्यालाच आधार मानतायत. ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या सर्व ठिकाणच्या निवडणुका आमच्या आदेशाधीन राहणार. मनपा, जि.परिषदा, पं.समित्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण नको', असंही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.



**कोर्टाची पुढील सुनावणी होणार २१ जानेवारीला**

५७ ज्या जागा आहेत जिथे ५० टक्क्यांपेक्षा जास्त ओबीसींचा टक्का पुढे गेला. तेथील निवडणुकीचाही मार्ग मोकळा झाल्याचे वकिलांनी सांगितले. पुढे त्यांनी म्हटले की, ओबीसी समाज असेल, राजकीय पक्ष असतील सर्वांनी आज सुटकेचा निश्वास टाकला असेल. ही मोठी गोष्ट असून राज्यात निवडणुका होणार असल्याचे स्पष्ट आहे.

ओबीसी आरक्षणाचे हे महत्त्वपूर्ण प्रकरण आता तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर दुसऱ्या आठवड्यात २१ जानेवारी २०२६ रोजी पाठवले जाईल. ज्येष्ठ वकील विकास सिंह यांनी तोपर्यंत निवडणुका थांबवण्याची मागणी केली, परंतु न्यायालयाने ती फेटाळून लावली.

# बापानेच केला मुलीवर अत्याचार

**नाशिक :** वडिल आणि मुलीच्या नात्याला काळीमा फासणारी धक्कादायक घटना नाशिकमध्ये घडली आहे. एका पित्याने सहा वर्षाच्या मुलीला दारु पाजून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला आहे. अत्यंत विचित्र पद्धतीने हे सर्व प्रकरण उघडकीस आले. या प्रकरणात पोलिसांनी नराधम पित्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणामुळे एकच खळबळ उडाली आहे.

**नाशिकमध्ये मुलीच्या नात्याला काळीमा फासणारी धक्कादायक घटना**

नाशिकमध्ये सावत्र बापाकडून लेकीचा छळ केल्याची घटना उघडकीस आली आहे. नाशिकच्या भगूर येथे ही घटना घडली आहे. पीडित मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादी नुसार देवळाली कॅम्प पोलिस ठाणे येथे नराधम सावत्र बापाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल बब्बू रावत असे या नराधमाचे नाव असून देवळाली कॅम्प पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

२६ नोव्हेंबर २०२५ रोजी हा प्रकार घडला आहे. सुकापूर पेठ, भगूर येथे संशयित राहुल रावत हा त्याची पत्नी आणि सहा वर्षाच्या सावत्र मुलीसोबत राहत होता. संशयित राहुल हा मोलमजुरीचे काम करतो. त्याने त्याच्या सहा वर्षाच्या सावत्र मुलीला राहत्या घरी आधी तिच्या अज्ञान पणाचा गैरफायदा घेऊन तिला जबरदस्तीने दारू पाजली त्यानंतर तिचा लैंगिक छळ केला. घरात पत्नी नसताना त्याने हे कृत्य केले. त्याची पत्नी घरी आल्यावर मुलीची अवस्था पाहून तिला संशय आला. यानंतर मुलीशी बोलल्यावर हा सर्व प्रकार आईच्या लक्षात आवा. हे सर्व प्रकरण लक्षात येताच पीडित मुलीच्या आईने देवळाली कॅम्प पोलिस ठाणे गाठून संशयित नराधम बापाविरोधात तक्रार दाखल केली. या तक्रारीनुसार देवळाली कॅम्प पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## थोडक्यात...

### पुण्यात २ डिसेंबरला निवडणुकांसाठी सुट्टी

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. आळंदी, बारामती, भोर, चाकण, दौंड, फुरसुंगी-उरळी देवाची, इंदापूर, जेजूरी, जुन्नर, लोणावळा, माळेगाव बुद्रुक, मंचर, राजगुरुनगर, सासवड, शिरूर, तळेगाव दाभाडे व वडगाव मतदारसंघांत सुट्टी राहणार आहे. केंद्र व निमशासकीय कार्यालये, बँका यांनाही सुट्टी लागू असून पात्र मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन करण्यात आले.

### फुटपाथवर थाटलं संपर्क कार्यालय

**नांदेड :** नांदेडमध्ये शिवसेना शिंदे गटाच्या जिल्हाप्रमुखांनी थेट रस्त्यावर अतिक्रमण करत फुटपाथवर कंटेनरचे संपर्क कार्यालय उभारले. विशेष म्हणजे या कार्यालयाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते काल रात्री करण्यात आले. विमानतळ रोडवर सांगवी भागात हे कार्यालय आहे. रात्री उद्घाटनाच्या धामधुमित ही बाब ठळकपने दिसून आली नाही. मात्र सकाळी फुटपाथवरच हे कार्यालय उभारल्याचं दिसून आलं. चक्क फुटपाथवर अतिक्रमण करून कार्यालय थाटल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. त्यामुळे आता या कार्यालयावर महापालिका काय कारवाई करते याकडे साऱ्यांचं लक्ष लागलंय.

### ऊस दरासाठी 'स्वाभिमानी' आक्रमक

**सोलापूर :** सोलापुरात ऊस दरासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली असून ऊसाला पहिली उचल ३ हजार ४०० रुपये द्या या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे रास्ता रोको आंदोलन सुरु आहे. सोलापूर विजयपूर राष्ट्रीय महामार्गावर होनमुर्गी फाट्यावर रस्तारोको आंदोलन करण्यात येत असून दोन्ही बाजूची वाहतूक खोळंबली आहे.

### प्रताप सरनाईक धाराशिव दौऱ्यावर

**धाराशिव :** शिवसेना आणि भाजप वादाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री प्रताप सरनाईक धाराशिव दौऱ्यावर आहेत. जिल्ह्यातील धाराशिव आणि उमरगा तसेच भूम आणि परंडा या चार नगरपालिकेत शिवसेना भाजप वाद टोकाला पोहचला आहे. उमरगा धाराशिव आणि कळंब तीन ठिकाणी पालकमंत्री प्रताप सरनाईक प्रचार सभा घेणार आहेत.दोन दिवसाच्या दौऱ्या दरम्यान पालकमंत्री प्रताप सरनाईक शिवसैनिकांची समजूत काढणार का? भाजप शिवसेना वाद कायम राहणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### आधारभूत किंमत योजनेंतर्गत सोयाबीनची होणार खरेदी

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारच्या वतीने यंदा शासकीय आधारभूत किंमत योजनेअंतर्गत सोयाबीनची खरेदी होणार. ५ हजार ३२८ रुपये इतका हमीभाव जाहीर करण्यात आला आहे. सोयाबीन नोंदणी ६ नोव्हेंबर पासून सुरू होईल. येवला येथील खरेदी-विक्री केंद्रावर ३२७ सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी नोंदणी केली. बारदाणा अभावी सोयाबीन खरेदी रखडली होती. तातडीने बारदाणा उपलब्ध करून देण्याची शेतकऱ्यांची मागणी आहे.

# आरक्षणाची मर्यादा ओलांडलेल्या ठिकाणी नव्याने सोडत काढणार

**मुंबई :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडू नका असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता राज्याचे निवडणूक आयोग सक्रिय झाल्याचं दिसतंय. निवडणुकीत ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण मर्यादा ओलांडणार नाही, त्यासाठी जिथं जास्त आरक्षण कोटा असेल तिथं पुन्हा सोडत करण्यात येणार असल्याची सूत्रांनी माहिती दिली. सुप्रीम कोर्टातली पुढली सुनावणी २१ जानेवारीला होणार आहे. मात्र सर्व निवडणुका कोर्टाच्या संभाव्य आदेशाधीन राहणार आहेत.

**न्यायालयाच्या आदेशानंतर निवडणूक आयोग सक्रिय**

सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला स्थगिती न देता ती ठरलेल्या वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या नगरपालिका निवडणुकीची प्रक्रिया कायम राहणार आहे. मात्र ज्या ठिकाणी ओबीसी आरक्षणाची मर्यादा ओलांडली आहे त्या ठिकाणचा निकाल हा न्यायालयाच्या संभाव्य निकालाच्या अधीन राहील असा निर्णय दिला आहे. तसेच राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि महाालिकेच्या निवडणुकीत आरक्षणाची मर्यादा न ओलांडता निवडणुका घ्या असे निर्देशही दिले आहेत.

# डिजिटल माध्यमांनी जबाबदारीने बातमी करणे गरजेचे

## 'तरुण भारत' डिजिटल न्यूज चॅनल उद्घाटनप्रसंगी राज्य डिजिटल पत्रकार संघाचे अध्यक्ष राजा माने यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**


**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर :** सध्या जग पुढे चालले आहे माध्यम वेगवेगळ्या रूपाने समोर येत आहेत. या माध्यमांचा हत्याराप्रमाणे वापर करायचा असेल तर डिजिटल माध्यमांनी जबाबदारीने बातमी प्रसारित करणे, बातमीची संपूर्ण माहिती शहानिशा करून देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य डिजिटल पत्रकार संघाचे अध्यक्ष राजा माने यांनी केले. गुरुवारी दैनिक 'तरुण भारत'च्या होटगी रोड येथील कार्यालयात सोलापूर तरुण भारत डिजिटल न्यूज चॅनलच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.



यावेळी समूह संपादक दिलीप पेठे, दुलंगे, मुख्य संपादक प्रशांत माने, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनिवास बिनगुंडी, व्यवस्थापक विनायक पुला, मराठवाडा आवृत्ती विभाग प्रमुख राजाराम मस्के, जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायणी, आदी उपस्थित होते. यावेळी माने पुढे म्हणाले, कोरोना काळानंतर माध्यमांची वेगवेगळी रूप नव्या शस्त्राप्रमाणे पुढे आली आहेत. त्या शस्त्रांचा वापर आपण समाजाच्या हितासाठी करायला हवा. ब्रेकिंग न्यूजला प्रचंड महत्त्व असले तरी ब्रेकिंग न्यूज देत असताना त्याची शहानिशा करणे, सत्य मांडणे वास्तवाचे भान ठेवणे ही बातमीदारी प्रामाणिकपणे करता आली पाहिजे. एआयच्या पुढचे जरी कोणते माध्यम आले तरी बातमीदारीला कोणताच प्रकारचा पर्याय नाही ती करावीच लागणार आहे असेही ते यावेळी म्हणाले.

याप्रसंगी दिलीप पेठे यांनी नव्या युगाबरोबर अपडेट राहण्यासाठी ही संकल्पना मांडली असल्याचे मत व्यक्त केले. तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांनी तरुण भारतने नव्या काळा प्रमाणे स्वतः बदल करून नवनव्या प्रयोगांना स्पर्श केला आहे, असे मत व्यक्त केले. बिनगुंडी यांनी लोकल ते ग्लोबल बातम्या देण्याचा एक वेगळा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार असल्याचे मत व्यक्त केले. तरुण भारत डिजिटल न्यूज चॅनलच्या चॅनेल हेड अश्विनी तडवळकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# ट्रॅक्टर पलटी झाल्याने दोन चिमुकल्यांचा मृत्यू




**अहिल्यानगर (श्रीगोंदा) :** श्रीगोंदा तालुक्यातील उक्कडगाव येथे जनावरांचा चारा आणण्यासाठी घेऊन गेलेल्या ट्रॅक्टरचा ताबा सुटल्याने ट्रॅक्टर पलटी झाल्यानं ट्रॅक्टरखाली दबलेल्या दोन लहान चिमुकल्यांचा जागीच मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना श्रीगोंदा तालुक्यातील उक्कडगाव येथे बुधवारी दि. २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत ट्रॅक्टर चालविणारी मुलांची आई आणि एक लहान मुलगी गंभीर जखमी झाले.

प्राप्ती किरण महाडिक (वय १० वर्ष) आणि शिवांश किरण महाडिक (वय ४ वर्ष) असं मयत झालेल्या चिमुकल्यांची नावे आहेत. तर कावेरी किरण महाडिक (वय ३५) आणि क्रांती किरण महाडिक असं जखमी झालेल्या माय लेकरांची नावे आहेत.

# सहा महापालिकेच्या निवडणुका उद्धव-राज ठाकरे एकत्र लढणार

**मुंबई :** माजी मुख्यमंत्री, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल (२७ नोव्हेंबर) मनसेप्रमुख राज ठाकरे यांची शिवतीर्थ या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यात मुंबई महानगरपालिकेसह विविध मुद्यांवर चर्चा झाली.

राज ठाकरेंची मनसे आणि उद्धव ठाकरेंचा शिवसेना ठाकरे गट राज्यातील सहा महापालिकेच्या निवडणुका एकत्र लढणार आहेत. मुंबई महापालिकेसह कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे महापालिकेत ठाकरेंची शिवसेना आणि मनसेची युती होणार आहे. ठाणे महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने ठाकरेंच्या शिवसेनेकडून राजन विचारे, तर मनसेकडून अविनाश जाधव यांना जागा वाटपाची चर्चा करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच कल्याण-डोंबिवली महापालिकेमध्ये मनसेचे माजी आमदार राजू पाटील, तर ठाकरेंच्या शिवसेनेकडून आमदार वरूण सरदेसाई यांच्याकडे जागा वाटपाच्या चर्चेची जबाबदारी असणार आहे.

- बृहन्मुंबई महापालिका
- ठाणे महापालिका
- कल्याण-डोंबिवली
- नवी मुंबई महापालिका
- पुणे महापालिका
- नाशिक महापालिका



मराठीबहुल भागातील अधिकाधिक प्रभाग मिळावेत यासाठी मनसे आग्रही असल्याची सुत्रांची माहिती आहे. शिवसेना ठाकरेंकडे विद्यमान नगरसेवक असलेल्या २० ते २५ जागांचीही मनसेकडून मागणी करण्यात आली आहे. तसंच ठाकरेंकडून शिंदे गटात गेलेल्या काही नगरसेवकांच्या जागांसाठीही मनसे आग्रही असल्याची माहिती समोर येत आहे. शिवसेना ठाकरे गटाची ताकद असलेल्याच अनेक जागा मनसे मागत असल्याने ठाकरे गटाची गोची झाली आहे. परंतु मनसेची संबंधित प्रभागातील संघटनात्मक ताकद, तगडा उमेदवार बघूनच जागा सोडण्यावर शिवसेना ठाकरे गट ठाम आहे.

दादर माहिम, वरळी, शिवडी, भायखळा, भांडूप, जोगेश्वरी या मराठीबहुल भागातील प्रभागांसाठी दोन्ही ठाकरे बंधूंमध्ये रस्सीखेच सुरु आहे. कोण कुठून लढणार? याबाबत ठाकरे बंधूंच्या चर्चेमध्ये काल ठोस तोडगा निघाला नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे दोन्ही बंधुमध्ये चर्चेच्या आणखी काही फेऱ्या अपेक्षित आहेत. निवडून येवू शकणाऱ्या एकेका जागांवर सखोल चर्चा राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यात होत आहे.

# पेन्शन, कर ते एलपीजी, १ डिसेंबरपासून नियम बदलणार

## आर्थिक नियोजनावर होणार परिणाम?

**नवी दिल्ली :** नोव्हेंबर महिन्याचा शेवटचा आठवडा सुरु आहे. नव्या महिन्यात काही आर्थिक बदल होणार आहेत. ज्याचा थेट परिणाम तुमच्या खिशावर होऊ शकतो. एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरांपासून पेन्शन, कर, सीएनजी आणि पीएनजीच्या दरात बदल होऊ शकतात. १ डिसेंबरपासून ५ मोठे नियम बदलले जाणार आहेत.

सरकारच्या मालकीच्या एलपीजी कंपन्यांकडून दर महिन्याच्या १ तारखेला सिलेंडरच्या दरातील बदल जाहीर केले जातात. १ डिसेंबरला व्यावसायिक आणि घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरचे दर जाहीर केले जातील. नोव्हेंबरमध्ये तेल कंपन्यांनी व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडरचे दर बदलले होते. १ नोव्हेंबरला १९ किलोच्या व्यावसायिक सिलेंडरच्या दरात ६.५० रुपयांची कपात करण्यात आली होती. घरगुती वापराच्या गॅसच्या दरात बदल करण्यात आलेले नाहीत. सरकारी कर्मचाऱ्यांना यूनिफाईड पेन्शन योजना निवडण्यासाठी ३० नोव्हेंबरची तारीख निश्चित करण्यात आली आहे. यापूर्वी



अंतिम मुदत ३० सप्टेंबर होती. कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याला एनपीएस किंवा यूपीएस पैकी एक पर्याय निवडावा लागणार आहे. जर सरकारी कर्मचाऱ्याला एनपीएस किंवा यूपीएस पैकी कोणताही एक पर्याय निवडायचा असल्यास ३० नोव्हेंबरपूर्वी तो निवडावा लागेल. १ डिसेंबरपासून हा पर्याय निवडण्याची संधी मिळण्याची शक्यता कमी आहे. ज्येष्ठ नागरिकांना पेन्शनचा लाभ घेण्यासाठी लाईफ सर्टिफिकेट जमा करावं लागेल. ३० नोव्हेंबरपर्यंत ती जमा करावी लागणार आहेत. जर एखाद्या व्यक्तीनं लाईफ सर्टिफिकेट जमा केलं नाही तर त्याची पेन्शन थांबू शकते.

ऑक्टोबरमध्ये टीडीएसमध्ये कपात झाली असेल तर तर सेक्शन १९४-ख-, १९४-खइ, १९४च् आणि १९४ड नुसार स्टेटमेंट जमा करावं लागेल. ज्याची शेवटची तारीख ३० नोव्हेंबर निश्चित करण्यात आली आहे. ज्या करदात्यांना सेक्शन ९२ए नुसार रिपोर्ट जमा करायचा असेल त्यांना तो ३० नोव्हेंबरपर्यंत जमा करावा लागेल.

तेल कंपन्यांकडून प्रत्येक महिन्यात एलपीजीसह सीएनजी, पीएनजी आणि एटीएफचे नवे दर जाहीर केले जातात. १ डिसेंबरला देखील तेल कंपन्या एलपीजीसह सीएनजी, पीएनजी आणि जेट फ्यूएलचे दर बदलू शकतात.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पुरुष नसबंदी पंधरवडा अंतर्गत जनजागृतीवर भर

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ नोव्हेंबर :** कुटूंब नियोजन हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण आहे. अद्यापही कुटूंब नियोजनाची जबाबदारी बऱ्याचदा स्त्रीलाच पार पाडावी लागते. कुटूंब नियोजनात पुरुषांच्या सहभागाला चालना देण्यासाठी पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया व निरोधचा वापर याचे प्रमाण वाढविण्याच्या हेतूने जागतिक पुरुष नसबंदी पंधरवडा सर्व राज्यात साजरा करण्यात येतो. लातूर जिल्ह्यामध्ये २१ नोव्हेंबर, २०२५ ते ४ डिसेंबर, २०२५ या काळात पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवाडा राबविण्यात येत आहे. यावर्षीचे या मोहिमेचे घोषवाक्य 'स्वास्थ व आनंदी कुटूंबाचे स्वप्न, पुरुषांच्या सहभागातून साकार' असे आहे. लातूर जिल्ह्यामध्ये आरोग्य विभागामार्फत ग्रामीण भागामध्ये नसबंदीसाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया सर्व शासकीय आरोग्य संस्थामध्ये मोफत केल्या जातात. तसेच लाभार्थ्यास प्रोत्साहनपर रुपये १ हजार ४५१ अनुदान दिले जाते. या पंधरवाडामध्ये जास्तीत जास्त पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया करुन घेण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे यांच्यामार्फत करण्यात आले आहे.



# राजीव गांधींच्या पुतळ्याचा संरक्षक कठडा दुरुस्त होणार तरी केव्हा?

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ नोव्हेंबर :** लातूर शहरातील औसा रोडवरील बहुचर्चित अशा राजीव गांधी चौकातील राजीव गांधींच्या पुतळ्याचा कठडा एका बाजूने तुटला आहे. शहराच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या या पुतळ्याच्या संरक्षक कठड्याची दुरुस्ती करण्याचा मुहूर्त प्रशासन साधणार तरी केव्हा? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

आजमितीस शहरातील राजीव गांधी चौक अतिशय वर्दळीचे ठिकाण झाल्याचे सर्वज्ञात आहे. दिवसापेक्षा सायंकाळच्या सुमारास ह्या चौकात दररोजच वाहतुकीची मोठी कोंडी होत असल्याचे पाहावयास मिळते. या एका चौकात वाहतुकीची कोंडी झाली की, त्याचे परिणाम त्यापुढे असणाऱ्या छत्रपती चौक, तसेच



नांदेड रोडकडे जाणाऱ्या वसंतराव नाईक चौक, कन्हेरी चौक, महात्मा बसवेश्वर चौकातील वाहतुकीवरही होताना दिसतात. त्यामुळे केवळ एकाच चौकातील वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करून प्रशासनाला चालणार नाही तर संपूर्ण वळण रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत कशी होईलही पाहणे महत्वाचे ठरणार आहे. नेहमीच वाहनांच्या गराड्यात असणाऱ्या राजीव गांधींच्या पुतळ्याचा पुतळ्याच्या उजव्या हाताच्या बाजूचा संरक्षक कठडा अनेक दिवसांपूर्वी एका वाहनाच्या धडकेत तुटला आहे. हा कठडा तुटला त्यावेळीच संबंधित प्रशासनाने त्याची तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक होते. मात्र, कोणत्याही प्रशासनाला जनरेट्याशिवाय जणू समस्येचे निराकरण करण्याची आता सवयच राहिलेली नाही. दिवंगत पंतप्रधानांच्या पुतळ्याचा कठडा तुटलेला असतानाही त्याच्या दुरुस्तीकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही. यावरूनच प्रशासनाची कार्यतत्परता दिसून येते.

राष्ट्र पुरुषांचे तथा राष्ट्रीय नेत्यांचे पुतळे समाजापुढे आदर्श निर्माण होण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेले असतात. त्याबरोबरच हे पुतळे शहराच्या सौंदर्यात भर टाकण्याचे कामही करत असतात.

अशावेळी या पुतळ्यांच्या सुरक्षिततेतची जबाबदारी अतिशय कटाक्षाने सांभाळणे अगत्याचे असते. पुतळ्यांची सुरक्षितता व देखभाल दुरुस्तीसाठी आवश्यक त्या निधीचा अभावही नसतो. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या बाबीकडे सूक्ष्मपणे लक्ष देणे गरजेचे असते. अनेक दिवसांपासून या पुतळ्याच्या कठड्याची बाजू तुटली असून ती व्यवस्थितरीत्या दुरुस्त करून पुतळ्याचे सुशोभिकरण होणार तरी केव्हा ? असा सवाल सुजाण लातूरकरांतून केला जात आहे.




# रेणापूर येथे संत सेवालाल महाराजांचे भवन बांधून देणार

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ नोव्हेंबर :** रेणापूर शहरासह कार्यक्षेत्रातील वाडी तांड्याच्या विकासासाठी भाजपाच्या नेतृत्वातील शासनाच्या माध्यमातून गेल्या पाच-सात वर्षात विविध विकास कामासाठी ७० ते ८० कोटी रुपयाचा निधी मंजूर करून आणला येत्या मार्चपर्यंत आणखी २५ कोटी रुपयांचा विकास निधी आणणार असून बंजारा समाज बांधवांनसाठी संत सेवालाल महाराज यांचे भव्य दिव्य भवन लवकरच बांधणार असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड यांनी पंधरा वर्षातील काँग्रेसच्या आमदारांनी रेणापूरच्या विकासासाठी कोणती कामे केली, किती निधी दिला याचा हिशोब काँग्रेसवाल्यांनी जनतेला द्यावा असे आवाहन केले.

रेणापूर नगरपंचायत निवडणुकीतील भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शोभा शामराव आकनगिरे आणि १३, १४, १५, १६ या प्रभागातील भाजपाचे उमेदवार उत्तम चव्हाण, ज्योती विजय चव्हाण, चतुरा साहेबराव लोकरे, अंजना दिलीप चव्हाण यांच्या प्रचारार्थ रेणुका नगर रूपचंद नगर परिसरात आ. रमेशआप्पा कराड यांची जाहीर सभा झाली. या सभेस भाजपाचे लातूर ग्रामीणचे माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे, भाजयुमोचे जिल्हा अध्यक्ष ऋषिकेशदादा कराड, विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, अनिल भिसे, श्रीनिवास

**रेणापूर शहराच्या विकासासाठी भाजपाने कोट्यावधीचा निधी दिला; काँग्रेसने पंधरा वर्षात काय दिले : आ. रमेशअप्पा कराड**

आकनगिरे, महेंद्र गोडभरले, सतीश आंबेकर, बन्सी भिसे, शरद दरेकर, शहराध्यक्ष अच्युत कातळे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते या सभेला बंजारा समाज बांधवासह चारही प्रभागातील मतदार बंधू भगिनींची मोठी गर्दी होती.

रेणापूर नगरपंचायतीच्या पहिल्या निवडणुकीत भाजपाचा नगराध्यक्ष होण्याचा मान मतदाराच्या आशीर्वादाने मिळाला असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, नगरपंचायतीवर भाजपाची सत्ता आल्याने केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून प्रशासकीय इमारत, अशोक सम्राट बौद्ध विहार, रेणुका देवी मंदिर भक्तनिवास, मुस्लिम बांधवांसाठी शादीखाना, नवीन पाणीपुरवठा योजना, ईदगाह मैदान संरक्षण भिंत, अंगणवाडी सुसज्ज इमारती, इंन्डोअर स्टेडियम, विविध समाजासाठी समाज मंदिरे, रस्ते, नाली बांधकाम यासह विविध कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून आणला आहे.

काँग्रेसने आजपर्यंत केवळ भुलथापा आणि खोटी आश्र्वासने देऊन सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला. गेल्या पंधरा वर्षात काँग्रेस आमदारांनी रेणापूर शहरात कुठल्या विकासाला निधी आणला कोणती कामे केली असा प्रश्न उपस्थित करून केंद्रात आणि राज्यात भाजपाची सत्ता आहे रेणापूरच्या विकासाची नगर पंचायतीतही भाजपाची सत्ता आवश्यक असून भाजपाच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन आ. रमेशआप्पा कराड यांनी केले. प्रारंभी विजय चव्हाण यांनी सभेचे प्रास्ताविक केले सभेचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. या सभेस दिनकर राठोड, गणेश चव्हाण, उज्वल कांबळे, संतोष राठोड, सुभाष राठोड, नंदकुमार मोठेगावकर, पांडुरंग वाकडे, देविदास राठोड, दगडू राठोड, लखू राठोड, भालचंद्र बिराजदार, गणपती चव्हाण, बाबुराव भोसले यांच्यासह कार्यकर्ते, पदाधिकारी, मतदार बंधू भगिनी उपस्थित होते.

# श्री चैतन्य टेक्नो स्कूलच्या मुख्याध्यापक, संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल

**मनसे विद्यार्थी सेनेच्या लढ्याला यश**

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ नोव्हेंबर :** महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या सततच्या पाठपुराव्यामुळे अखेर येथील श्री चैतन्य टेक्नो स्कुलच्या मुख्याध्यापक व संचालकांवर लातूरच्या पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पालक व शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल केला गेला आहे.

लातूर येथील श्री चैतन्य टेक्नो स्कूलच्या व्यवस्थापनाकडून पालकांची व शासनाची फसवणूक केली जात असल्याप्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने गेल्या दीड वर्षांपासून लातूर मधील अनधिकृत चालविण्यात येणाऱ्या या शाळेविरोधात आवाज उठवला होता. शासनाची कोणतीही परवानगी न घेता शाळा पालकाची फसवणूक करून लाखो रुपयाची फिस वसूल केली जात होती. ही बाब मनविसेच्या पदाधिकाऱ्यांच्या लक्षात आल्यावर मनविसेचे जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश उपाध्यक्ष किरण चव्हाण यांच्या नेतृत्वात शिक्षण विभागाला निवेदन देण्यात आले होते.

त्यानुसार शिक्षण विभागाने तात्काळ कारवाई करत दि. २१ जुलै २०२५ रोजी शाळेला सिल लावून आरटीई एक्ट २००९ नुसार शाळेला प्रथम दिवशी १ लाख आणि पुढील दर दिवशी १० हजार प्रमाणे ७ लाखाचा दंड आकारण्यात आला होता. तो दंड न भरता शाळा प्रशासनाने शाळा चालूच ठेवली होती.त्यानंतर मनविसेने शाळेसमोर निदर्शने करून संताप व्यक्त केला होता. तरी देखील शाळा चालू ठेवली गेली, दीपावली सुट्ट्या नंतर शाळा प्रशासनाने लावलेले सिल तोडून इमारतीत मध्ये परीक्षा घेत असल्याचे मनसेच्या निदर्शनास आले. तेव्हा याची तात्काळ माहिती शिक्षण विभागास कळविली गेली. त्यानंतर तात्काळ दि. १९ नोव्हेंबर रोजी गटशिक्षण अधिकारी यांनी कर्मचारी पाठवून तपासणी केली असता सील तोडून शाळा चालू असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी पंचनामा करून वरिष्ठाकडे अहवाल पाठवला. माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ. दत्तात्रय मठपती यांनी या प्रकरणी पोलिसात गुन्हा नोंद करण्याचे आदेश दिले. त

या आदेशानुसार शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दि. २७ नोव्हेंबर रोजी पालकाची व शासनाची फसवून केल्याचा श्री चैतन्य टेक्नो स्कूल याच्या मुख्याध्यापक व संचालक यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती मनविसेचे जिल्हाध्यक्ष किरण चव्हाण यांनी दिली.

यापुढेही नियमबाह्य शाळा चालवणाऱ्यांवर कठोर कार्यवाहीचा बडगा उगारण्यास प्रशासनास भाग पाडू असेही किरण चव्हाण यांनी सांगितले.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे २ डिसेंबर रोजी आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ नोव्हेंबर :** युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी प्रतिवर्षी केंद्र शासनाच्यावतीने १२ ते १६ जानेवारी या कालावधीत राष्ट्रीय युवा महोत्सव आयोजित करण्यात येतो. राष्ट्रीय युवा महोत्वामध्ये राज्याचा प्रातिनिधीक संघ सहभागी करण्यासाठी राज्य शासनाने प्रतिवर्षी जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन २ डिसेंबर, २०२५ रोजी लातूर येथे करण्यात येणार आहे. या स्पर्धेमधून प्रथम क्रमांकाच्या स्पर्धकाची विभागीय युवा महोत्सवासाठी निवड करण्यात येणार आहे.

यासाठी स्पर्धकांचे प्रवेश अर्ज १ डिसेंबर, २०२५ रोजी पर्यंत क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे (मो. ९९७५५६६००) यांच्याकडे सादर करावेत. जिल्ह्यामधील सर्व शाळा, महाविद्यालय, युवक मंडळे यातील इच्छूक कलावंताना, स्पर्धकांना यामध्ये सहभागी होता येईल.

समूह लोकनृत्य, समूह लोकगीत, कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व (भारतातील आणीबाणीचा काळ आणि संविधानोचे उल्लंघन आणि लोकशाही व लोकशाही मूल्यांचे संरक्षण), कविता लेखन, नवोपक्रम (विज्ञान प्रदर्शन) या जिल्हास्तरावर युवा महोत्सव स्पर्धा २ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी १० वाजता लातूर जिल्हा क्रिडा संकुल येथे आयोजित करण्यात आल्या आहेत. जिल्हास्तरीय युवा महोत्वामध्ये सहभागी होण्यासाठी इच्छूक स्पर्धकांनी १ डिसेंबर, २०२५ पर्यंत आपले अर्ज लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

# दत्तनगरीत रौप्य महोत्सवी श्री दत्त जयंती उत्सवास प्रारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ नोव्हेंबर :** लातूर शहरापासूनच जवळच असलेल्या नांदगाव इथिओल दत्तनगरीतील श्री दत्त मंदिर देवस्थानमध्ये रौप्य महोत्सवी दत्त जयंती उत्सवास थाटात प्रारंभ झाला. दत्तनगरीचे संस्थापक गुरुवर्य प.पू. गुलाबगिरी महाराज यांच्या दिव्य सान्निध्यात हा उत्सव साजरा करण्यात येत आहे.

नांदगावच्या माळरानावर गुरुवर्य प.पू. गुलाबगिरी महाराजांनी श्रीदत्त मंदिर देवस्थानची उभारणी करून या जागेचे मनमोहक अशा नंदनवनात रुपांतर केले आहे. मागच्या २५ वर्षांपासून या ठिकाणी श्रीदत्त जयंतीचा उत्सव विविध धार्मिक कार्यक्रम, भजन, किर्तनाने हर्षोल्हासात साजरा केला जातो. या उत्सवाचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही श्री गुरुचरित्र पारायण, श्रीमद याग व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास सुरुवात झाली आहे. सप्ताहाचे औचित्य साधून बुधवारी श्रीदत्त



महाराजांच्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत भक्तिमय वातावरणात गुलाबगिरी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली हा पालखी सोहळा पार पडला. गुरुवारी सायंकाळी हभप. गोपाळदेव जोशी महाराज ढाळे गावकर यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. आपल्या ओघवत्या वाणीतील किर्तनाने महाराजांनी उपस्थित भाविक भक्तांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. यानिमित्त श्री दत्त भजनी मंडळ. नांदगाव, संतकृपा भजनी मंडळ, राघवेंद्र महिला भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम झाला. शुक्रवारी जनाबाई महिला भजनी मंडळाच्या भजनी मंडळाने उत्तम भजने तसेच गवळणी प्रस्तुत करून भाविक भक्तांची मने जिंकली शाम मोरे यांच्या गवळणीने उपस्थित भाविक आपले देहभान हरवून गेल्याची अनुभूती आली.

या वर्षीच्या उत्सवाविषयी बोलताना गुलाबगिरी महाराज म्हणाले की, प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही श्रीदत्त महाराजांच्या कृपाशीर्वादाने अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीचा सोहळा रौप्य महोत्सवी असल्याने प्रतिवर्षाच्या तुलनेत भाविक भक्तांची उपस्थितीही लक्षणीय असणार आहे. त्यादृष्टीने देवस्थानच्या वतीने सर्वतोपरी नियोजन करण्यात आले आहे. सप्ताहादरम्यान भाविकांसाठी दररोज महाप्रसादाचीही सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सोहळ्यास विविध समाजाच्या स्तरातील मान्यवरांचे सहकार्य लाभले असून या सोहळ्याचा परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही गुलाबगिरी महाराजांनी केले आहे.

# लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये संविधान दिवस

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ नोव्हेंबर :** लातूर येथील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या प्रभारी प्राचार्या नम्रता झांबरे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका रुपाली कोकाटे, विद्या पाटील यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

२६ नोव्हेंबर हा दिवस भारताच्या लोकशाही इतिहासात अतिशय खास मानला जातो. या दिवशी भारतीय लोकशाहीचा पाया रचला गेला. भारतात दरवर्षी आजचा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा केला जातो. संविधानातील प्रत्येक शब्दाचा अर्थ मुलांना शाळेचे समन्वयक रौफ शेख यांनी समजाऊन सांगीतला. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन केले. शिक्षक, शिक्षीका यांनी संविधान दिवसाच्या



याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांच्याप्रतिमेस अभिवादन केले. प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमास उपस्थित असलेले श्रीकृष्ण लाटे, शाळेतील विदयार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षीका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

## खड्डेविषयक कार्यवाहीसाठी समिती गठीत

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ नोव्हेंबर :** मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्रमांक ७१/ २०१३ मधील अंतरीम अर्ज क्र. २९११९/२०२५ मध्ये उच्च न्यायालयाने दिलेल्या १३ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या आदेशानुसार समिती गठीत करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्यांवरील खड्डे, मॅनहोल यामुळे होणारे अपघात, मृत्यू च्याअनुषंगाने नुकसान भरपाई देण्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत या समितीचे सदस्य सचिव सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव हे असतील.

# जागतिक एड्स दिनानिमित्त १ डिसेंबर रोजी सायकल रॅली

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २८ नोव्हेंबर :** महाराष्ट्र एड्स नियंत्रण संस्था व जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांच्या सूचनेनुसार जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय यांच्यावतीने १ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. जागतिक एड्स दिनानिमित्त एचआयव्ही, एड्स जनजागृतीसाठी होत असलेल्या या उपक्रमाचे घोषवाक्य 'अडथळ्यांवर मात करून, एकजूटीने एचआयव्ही, एड्सला लढा देवू, नवं परिवर्तन घडवू' असे आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून सायकल रॅलीला सुरुवात होईल.

या रॅलीत लातूरमधील सायकल क्लब, विद्यार्थी, स्थानिक सामाजिक संस्था, मान्यवर व्यक्ती, शासकीय अधिकारी व कर्मचारी सहभागी होणार आहेत. तसेच रॅलीच्या समारोप प्रसंगी रेड रिबन क्लब विद्यार्थीमार्फत जगजागृतीपर फ्लॅश मॉब कार्यक्रम घेण्यात येणार आहे. या सायकल रॅलीत नागरिकांनी सहभागी होण्याचे आवहन जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयामार्फत करण्यात आले आहे. तसेच १ डिसेंबर, २०२५ रोजी दुपारी २ वाजता एचआयव्ही जीवन जगणाऱ्या ११ ते १८ वर्षे वयोगटातील मुला-मुलींसाठी चित्रकला स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर १ ते १५ डिसेंबर, २०२५ या कालावधीत जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये व्याख्याने, पोस्टर प्रदर्शन, विविध स्पर्धा, जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### युवा महोत्सवात पाश्चिमात्य समूह संगीताची रंगत




**छत्रपती संभाजीनगर, २८ नोव्हेंबर :** असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या ३९ व्या सेंट्रल झोन युवा महोत्सवात जेएनईसी लॉन्स, एमजीएम विद्यापीठ येथे पाश्चात्य समूह संगीत (वेस्टर्न ग्रुप साँग्स) स्पर्धेत विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांना संगीताच्या वेगळ्या विश्वात नेले. महाराष्ट्र, छत्तीसगड आणि मध्यप्रदेशातील विद्यापीठांच्या संघांनी आपल्या उत्तम अशा संगीतकौशल्याने संगीत मैफल रंगवली. प्रत्येक समुहाने आपल्या शैलीतून पाश्र्चात्य संगीताच्या वेगवेगळ्या छटा सादर करत प्रेक्षकांचे मन मोहून टाकले. संगीताच्या माध्यमातून तरुणाईचा उत्साह, उमेद आणि कलाप्रेम यांची बहारदार रंगत या स्पर्धेत अनुभवायला मिळाली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणात केवळ संगीताची उत्कृष्टता नव्हे तर विद्यापीठांनी दिलेले भक्कम सांस्कृतिक आणि कलात्मक प्रशिक्षणही प्रभावीपणे प्रतिबिंबित झाले.

### मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे प्रलंबित अर्ज १५ डिसेंबर पूर्वी निकाली काढा-कोकरे

**छत्रपती संभाजीनगर, २८ नोव्हेंबर :** इतर मागास बहुजन कल्याण विभागातर्फे विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. पात्र विद्यार्थ्यांचे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरण्याची प्रक्रिया ३० जून पासून सुरु झाली आहे. सर्व पात्र विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क, शियवृत्ती, परीक्षा शुल्क योजनेचे आवेदनपत्र महाविद्यालयांनी भरुन सहायक संचालक इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभाग यांच्या कार्यालयात मंजूरीसाठी पाठवावयाचे आहेत. शिष्यवृत्ती अर्ज हे महाडीबीटी पोर्टलच्या लॉगईन मध्ये अल्प प्रमाणात भरण्यात आले आहेत. तरी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी स्वतः विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन लॉगईन करावे. दि.१५ डिसेंबर पर्यंत आपपल्या महाविद्यालयांचे अर्ज भरुन निकाली काढावे. एकही विद्यार्थी शिष्यवृत्ती लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी,असे सहाय्यक संचालक दयानंद कोकरे यांनी कळविले आहे.

### मराठी उद्योजकांसाठी ट्रेन द एक्झिम्प्रेनरच्या दहाव्या ऐतिहासिक उपक्रमाचे यशस्वी आयोजन

**मुंबई :** नेस्को मुंबई एका असाधारण परिवर्तनाच्या चळवळीची साक्षीदार ठरली आहे. महाराष्ट्राचे आघाडीचे व्यवसाय मार्गदर्शक आणि उद्यमी महाराष्ट्र उपक्रमाचे संस्थापक डॉ. ओमकार हरी माळी यांनी केवळ मराठी समुदायासाठी आयोजित केलेला ट्रेन द एक्झिम्प्रेनर या ऐतिहासिक दहाव्या उपक्रमात तब्बल दोन हजारांहून अधिक उदयोन्मुख मराठी उद्योजक सहभागी झाले होते. केवळ मराठी उद्योजकांसाठी आणि आयात-निर्यातीच्या क्षेत्राबाबत सखोल ज्ञान प्रदान करणारा भारतातील हा सर्वात मोठा शैक्षणिक कार्यक्रम ठरला.महाराष्ट्रातील जनतेला अधिकाधिक प्रगत आणि सक्षम बनवण्याच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर आधारलेल्या या उपक्रमातून डॉ. ओमकार यांनी तीन दिवस जागतिक पातळीवरील व्यापाराबाबतती स्थिती, वास्तविक जगातात असलेली उद्योजकता, मानसिकतेत परिवर्तन घडविणे आणि आध्यात्मिक समतोल या घटकांचा मिलाफ घडवत उपस्थितांना ज्ञानसंपन्न बनविले. विशेषतः मराठी भाषिक उदयोन्मुख उद्योजकांसाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आलेला होता.

### एनबीबीएलचे बँकिंग कनेक्ट इंटरनेट बँकिंगचा अविस्मरणीय अनुभव देणार

**नाशिक :** नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या एनपीसीआय भारत बिलपे लिमिटेडने बँकिंग कनेक्टसह डिजिटल पेमेंटचा अत्यंत आधुनिक दृष्टिकोन सादर केला आहे. हा एक नवीन इंटरऑपरेबल प्लॅटफॉर्म आहे जो इंटरनेट आणि मोबाइल बँकिंगच्या अनुभवाची पुनर्परिभाषा करण्याचे आश्र्वासन देतो. आरबीआय गव्हर्नर माननीय श्री. संजय मल्होत्रा यांच्या उपस्थितीत ग्लोबल फिनटेक फेस्टिव्हल २०२५ दरम्यान हे बँकिंग कनेक्ट लाँच करण्यात आले. आजच्या नेट बँकिंग वर्कफ्लोमध्ये अनेकदा गुंतागुंतीची ग्राहक क्रेडेन्शियल्स आणि नॉन स्टँडरडाईज्ड सेटलमेंट प्रक्रिया अशा अनेक गोष्टींची एकत्रितरित्या गरज भासते.

### इसुजू मोटर्स इंडियाने सर्व्हिस सेंटरचे उद्घाटन

**लातूर:** ग्राहकांना सुलभ आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देण्याच्या वचनबद्धतेला बळकटी देत, इसुजू मोटर्स इंडियाने लातूर, महाराष्ट्रातील लातूर येथे नवीन अधिकृत सर्व्हिस सेंटर 'गरजे मोटर्स' सुरू केले आहे. हे सेंटर एमआयडीसी लातूर येथे स्थित असून, २५००० चौ.फुट क्षेत्रात पसरलेले आहे. आधुनिक सेवा सुविधा असलेल्या या सेंटरमध्ये वाहनांची उच्च दर्जाची देखभाल व दुरुस्ती कार्य कार्यक्षमतेने पार पाडले जाईल. उद्घाटन कार्यक्रमात महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य अमित देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या अधिकृत सर्व्हिस सेंटरचे उद्घाटन इसुजू मोटर्स इंडियाचे वरिष्ठ अधिकारी आणि गरजे मोटर्सचे मुख्य प्रतिनिधीं यांनी केले.

### एसुस भारतातीबर २ कंझ्युमर नोटबुक कंपनी बनली

**मुंबई :** तैवानी तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपनी एसुसने २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत भारतातील नंबर २ कंझ्युमर नोटबुक कंपनी म्हणून आपले स्थान मजबूत केले आहे, असे आयडीसी क्वार्टरली पर्सनल कॉम्प्युटिंग डिव्हाइस ट्रॅकर, २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीनुसार म्हटले आहे.हा टप्पा एसुसच्या उल्लेखनीय वर्षानुवर्षे वाढीला अधोरेखित करतो, जो भारतातील ६००+ हून अधिक जिल्ह्यांमध्ये उत्पादन अनुभव वाढवण्यासाठी त्यांचे उत्पादन पोर्टफोलिओ लक्षणीयरीत्या वाढवून ग्राहकांच्या जवळ जाण्यावर धोरणात्मक लक्ष केंद्रित करून चालवला जातो. व्यवसायाचा विस्तार आणि नवीन भागीदारांना ऑनबोर्डिंग करण्यापासून ते बाजारपेठांमध्ये उपस्थिती मजबूत करण्यापर्यंत, एसुस इंडियाने एसुस एआय पीसी, ग्राहक आणि गेमिंग नोटबुक तसेच एआयओ, डेस्कटॉप आणि ॲक्सेसरीज विभागांमध्ये अभूतपूर्व नवोपक्रम सादर केले.

### मिमिक्री स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**छत्रपती संभाजीनगर, दि.२८ :** असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या युवा महोत्सव अंतर्गत आज रुक्मिणी सभागृह, एमजीएम विद्यापीठ येथे झालेल्या मिमिक्री स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. १७ विद्यापीठांतील स्पर्धकांनी विविध शैली, आवाजातील चढ-उतार आणि अभिनयातील सूक्ष्मता अप्रतिमरीत्या सादर करत सभागृहात हास्याचा वर्षाव केला. स्पर्धेची रंगत सुरुवातीलाच वाढली जेव्हा विद्यार्थ्यांनी लोकप्रिय कार्टून पात्रांच्या हुबेहूब आवाजांची मिमिक्री सादर केली. डोरेमोन, मोटू-पतलू आणि इतर ॲनिमेटेड कॅरेक्टर्स स्टेजवर जिवंत झाल्याचा भास प्रेक्षकांना झाला आणि सभागृहात आनंदाचे वातावरण पसरले. रंगमंचावर हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलाकारांचे आवाज आविष्कृत झाले.

# अभिनेते उपेंद्र लिमयेंच्या उपस्थितीत होणार युवा महोत्सवाचा समारोप

**छत्रपती संभाजीनगर, दि. २८ :** असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीच्या ३९ व्या सेंट्रल झोन युवा महोत्सवाचा समारोप समारंभ शनिवार, दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता जेएनईसी लॉन्स, एमजीएम विद्यापीठ येथे संपन्न होणार आहे.

समारोप सोहळ्याच्या कार्यक्रमास एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, एआययुच्या सहसचिव डॉ.ममता राणी अग्रवाल, एआययुचे अधिकारी डॉ.निर्मल जौरा, दीपक कुमार झा, महोत्सवाचे सचिव डॉ.शिव कदम, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित असणार आहेत.

या युवा महोत्सवात महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्यांतील २३ विद्यापीठांमधून सुमारे १२०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला आहे. समारोपाला



सुप्रसिद्ध अभिनेते उपेंद्र लिमये प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून विविध क्षेत्रातील मान्यवरही यावेळी उपस्थित असणार आहेत. मागील चार दिवसांपासून सुरू असलेल्या सांस्कृतिक, कलात्मक आणि बौद्धिक स्पर्धांचा समारोप सोहळा उत्साहात पार पडणार असून विजेत्या संघांना पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. युवा प्रतिभेला व्यासपीठ देणाऱ्या या महोत्सवाच्या समारोपासाठी विद्यार्थी, स्पर्धक तसेच नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे.



## समूह संगीताच्या सुरांनी रंगला महोत्सव

**छत्रपती संभाजीनगर, दि. २८ :** असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या ३९ व्या सेंट्रल झोन युवा महोत्सवात भारतीय समूह संगीत स्पर्धेने संगीतप्रेमी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड येथून आलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या प्रभावी सादरीकरणांनी संगीतमय वातावरण तयार केले होते.

कार्यक्रमाची सुरुवात वंदे मातरम आणि हमे फिर से धरा पर ज्ञान की गंगा बहानी है या प्रभावी गीतांनी झाली आणि क्षणातच जेएनईसी लॉन्स, एमजीएम विद्यापीठ येथे देशभक्तीची आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. त्यानंतर प्रत्येक विद्यापीठाने आपल्या खास संगीतशैलीतून एकता, सांस्कृतिक वैविध्य आणि भारतीय सुरांची समृद्ध परंपरा प्रेक्षकांसमोर सुंदरपणे सादर केली. ताल, लय आणि सुरांच्या अप्रतिम संगमात प्रेक्षक पूर्णपणे तल्लीन झाले.

# निवडणूक पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांची नगरपरिषदेस भेट



**खुलताबाद, दि. २८ :** खुलताबाद नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक - २०२५ पार्श्वभूमीवर मा. जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी दि. २७ नोव्हेंबर २०२५ रोजी नगरपरिषद खुलताबाद येथे आढावा बैठक घेतली. यावेळी सर्व नोडल अधिकारी, झोनल अधिकारी तसेच इतर निवडणूक बाबत कामकाज पहाणारे अधिकारी कर्मचारी यांचा निवडणूक कामकाज बाबत आढावा घेण्यात आला.

तसेच जिल्हाधिकारी यांनी श्री घृणेश्र्वर महाविद्यालय व पंचायत समिति कार्यालय येथील मतदान केंद केंद्राची पाहणी करून चाचपणी करून मतदान केंद्रामधील व्यवस्थेबाबत तपासणी केली.

नगरपरिषद कार्यालय येथ ईव्हीएम स्ट्राँग रूम ची संपूर्ण पाहणी करून तेथील संपूर्ण व्यवस्थेबाबत व सुरक्षाव्यवस्था बाबत आढावा घेतला.

नगरपरिषद निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठ उपक्रम राबविणे बाबत मा. जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना सूचना केल्या. तसेच शहरातील ६५ दुबार मतदारा बाबत नगरपरिषदेने संबंधित मतदाराकडून कोणत्या प्रभागात मतदान करणार याबाबत हमीपत्र घेतल्याची माहिती मुख्याधिकारी यानी जिल्हाधिकारी यांना दिली.

जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण निवडणूक व्यवस्था कामकाजबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी स्वरूप कंकाळ निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार खुलताबाद, समीर शेख सहा.निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद खुलताबाद, यांनी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे नगरपरिषद च्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी कार्यालयीन अधीक्षक रुस्तुम फुलारे अश्विनी नंदा, जितेंद्र बोचरे, अंकुश भराड पाटील यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्ह्यात एकल वापराच्या प्लास्टिक बंदीबाबत मोहीम राबवा : जिल्हाधिकारी

**अहिल्यानगर, २८ नोव्हेंबर :** एकदाच वापराच्या प्लास्टिक वस्तूंवर बंदी असतानाही शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर साठवणूक, विक्री, वाहतूक आणि



वापर सुरू आहे. त्यामुळे व्यापक जनजागृतीबरोबरच साठवणूकदार आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा पर्यावरण समितीची बैठक पार पडली. बैठकीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी चंद्रकांत शिंदे, समितीचे सदस्य तथा हरियालीचे अध्यक्ष सुरेश खामकर, प्रा. डॉ. सतीश कुलकर्णी, रविराज पाटील, अमित लाटे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यातील नगरपालिका व महापालिकांनी दरवर्षी पर्यावरणावरील स्थिती अहवाल तयार करणे बंधनकारक आहे. मात्र अनेक वर्षांपासून हा अहवाल तयार न केल्यामुळे पर्यावरणस्थितीचे अचूक आकलन होत नाही. त्यामुळे येथून पुढे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी हा अहवाल त्वरित तयार करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

बैठकीत विटभट्ट्यांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, नायलॉन मांजा साठवणूक, वाहतूक, विक्री व वापरावर पोलीस विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत कठोर कारवाई, रस्त्यावरील धूळ नियंत्रणासाठी आधुनिक धूळशोषक यंत्रांचा वापर, नदीप्रदूषण नियंत्रण, घनकचरा व्यवस्थापन, वनक्षेत्र वाढविणे, तसेच पर्यावरण संरक्षण, संवर्धन व जनजागृती उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी यावर सविस्तर चर्चा झाली.

# १३० दुचाकींचे सायलेन्सर जप्त करून रोड रोलरखाली दाबले

**नगर :** शहरात दुचाकी वाहनांच्या सायलेन्सरमध्ये अनधिकृतपणे बदल करून फटाकड्यांसारखा विचित्र व कर्कश आवाज निर्माण करण्याचे अनुचित प्रकार गेल्या काही दिवसांपासून सुरू होते. ध्वनी प्रदूषणाच्या समस्येमुळे नागरिक त्रस्त झाले होते. ही बाब लक्षात घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व अपर पोलीस अधीक्षक वैभव यांच्या मार्गदर्शनाखाली शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक दिलीप टिपरसे यांनी गेल्या एक महिन्यापासून अशा दुचाकी वाहनांवर कारवाईची मोहीम सुरू केली होती.

गेल्या महिनाभरातील कारवाई मध्ये १३० दुचाकींचे अनधिकृतपणे बदल केलेले कर्कश आवाजाचे सायलेन्सर आज आयुर्वेद महाविद्यालयाजवळील चौकात रोड रोलरखाली दाबून निरुपयोगी करण्यात आले. आतापर्यंतची ही अशा प्रकारची सर्वात मोठी कारवाई मानली जाते. यापुढेही अशाप्रकारे सायलेन्सरमध्ये बेकायदेशीरपणे बदल करून ध्वनी प्रदूषण करणाऱ्या व सामाजिक शांतता भंग करणाऱ्या वाहन चालकांवर कायदेशीर कारवाई सुरु राहणार असल्याचे श्री टिपरसे यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी तोफखाना पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक जगदीश भांबळ, कोतवाली पोलिस स्टेशनचे



संभाजी गायकवाड, भिंगार कॅम्प पोलिस स्टेशनचे सपोनि. जगदीश मुलगीर व शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पो.नि. बाबासाहेब बोरसे, पोउनि. शमुवेल गायकवाड, रविंद्र धायतडक यांसह पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. कर्कश आवाज निर्माण करून छाप पाडण्यासाठी दुचाकीच्या सायलेन्सरमध्ये अनधिकृत फेरबदल करू नयेत व संभाव्य कारवाई टाळण्यासाठी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक दिलीप टिपरसे यांनी केले आहे.

# शेती निर्णय प्रक्रियांमध्ये महिलांचा सहभाग वाढवणे आवश्यक : देशमुख

**सिल्लोड, दि. २६ नोव्हेंबर :** राज्यस्तरीय संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन स्वयम् शिक्षण प्रयोगमार्फत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय कृषी अधिकारी पी. आर. देशमुख उपस्थित होते.

या कार्यशाळेत कृषी विज्ञान केंद्राकडून डॉ. अनिता जिंतुरकर आणि नायब तहसीलदार रोजगार हमी योजना विभाग चे गोरखनाथ सुरे आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. कार्यक्रमामध्ये छ. संभाजीनगर व परभणी जिल्ह्यातील महिला शेतकरी सहभागी झाल्या. प्रमुख पाहुणे देशमुख यांनी पिकांचे विविधिकरण आपल्याला पूर्ववत करावे लागेल असा सल्ला दिला. तसेच सेंद्रिय शेती, हवामान बदलाशी सुसंगत शेती, मिश्र पीकपद्धती व कृषीपूरक व्यवसायाचे महत्त्व, आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती त्यांनी स्पष्ट केली. डॉ. अनिता जिंतुरकर यांनी महिलांनी कृषीपूरक व्यवसाय उभा करून आपले आर्थिक उत्पन्न वाढविण्याचे मार्ग सांगितले. यासोबतच नायब तहसीलदार रोजगार हमी योजनेचे श्री गोरखनाथ सुरे यांनी महिला शेतकऱ्यांशी हितगुज साधुन विभागाच्या योजनांची माहिती दिली. सम्राट कसबे यांनी एसएसपीचे ध्येय, उद्दिष्टे व पुढील दिशा स्पष्ट केली व महिला पुढाकारातून पर्यावरण पुरक शेती या प्रकल्पाची माहिती दिली.

कार्यक्रमात एसएसपीचे वैषाली घुगे, शुभम कुमावत, पुष्पा तूपे, ऋषिकेश कसबे, वर्षा आलापुर, सुप्रिया कांबळे, प्रिया राखुंडे, अंजली झाडके, पंकज वैद्य उपस्थित होते.



## एआई प्लस ने लॅपटॅब सादर केले

**नवी दिल्ली :** भारतातील सर्वात वेगाने वाढणारा टेक ब्रँड असलेल्या एआई प्लस ने आज एआई प्लस लॅपटॅब ही एक नवीन स्मार्ट डिव्हाइस श्रेणी लाँच केली आहे जी लॅपटॉपची उत्पादकता आणि टॅब्लेटची पोर्टेबिलिटी एकत्र करते.

भारतातील शिकणाऱ्या, निर्माते आणि व्यावसायिकांच्या संकरित पिढीसाठी डिझाइन केलेले, हे उपकरण तीन आकारांमध्ये उपलब्ध असेल: ११, १२ आणि १३ कीबोर्ड आणि स्टायलस सपोर्टसह. ते २०२६ च्या पहिल्या तिमाहीत फ्लिपकार्ट आणि एआई प्लस च्या रिटेल भागीदारांद्वारे देशभरात उपलब्ध असेल.

■ **सोयगाव,दि.२८ नोव्हेंबर :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जंगलातांडा केंद्र तालुका सोयगाव येथे पालक मेळावा, संविधान दिन तसेच दससुत्री कार्यक्रमांतर्गत आरोग्य क्षम विद्यार्थी याकरिता आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरामध्ये डॉ.चेतन काळे यांनी विद्यार्थ्यांना आपल्या आरोग्याबाबत घ्यावयाची काळजी याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.

**Franklin Templeton Mutual Fund**

Cordially invites you for a program under it's Investor Education and Awareness Initiative.

Venue:
Godavari Restaurant, Vardhman Complex,
Main Road, Dharmabad, Nanded - 431809.

Date: 1st December, 2025
Time: 12:00 p.m.

Contact Person: Ashish Gampawar (9420549280)

Due to limited seats, entry will be provided to registered attendees only. Please call on the above number to register by tomorrow.

We look forward to your participation.

FRANKLIN TEMPLETON

Registered office: One International Centre, Tower 2, 12th & 13th Floor, Senapati Bapat Marg, Elphinstone (West), Mumbai - 400013

**Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.**

### जाहीर प्रगटन

**मा. की. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात,**

दि.कि. अर्ज क्र.४०९/२०२५
पुढील तारीख बढाडलारू२६

अर्जदार १) बाल्मीक हरीचंद्र सुर्यवंशी, वय ३९ वर्षे धंदा शेती, रा. बनदाता कन्नड जि. औरंगाबाद. २) अजय हरीचंद्र सूर्यवंशी वय २६ वर्षे धंदा शेती, रा. बनदाता कन्नड जि. औरंगाबाद. ३ ) रेखा कडूबा जाधव, वय ३७ वर्षे धंदा घरकाम, रा. कुंभारवाडा, दौलताबाद तर जि. औरंगाबाद. स्वाती गणेश राऊत, वय ३० वर्षे धंदा परकाम्, रा. सामनगाव स्टेशन, एकलहरी नाशिक, ता. जि. नाशिक. ४) ५ ) लहाणुबाई भ्र. हरीचंद्र सुर्यवंशी, वय ७१ वर्षे धंदा. शेती, रा. बनशंदा ता. कन्नड जि. औरंगाबाद.
विरुध्द गैरअर्जदार
अर्ज : निरंक
बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.
या अधी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ एस. आर. शिंदे यांचे मार्फत विदयमान न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे को, हे की, अर्जदार क्र. १ ते ५ हे वरील ठिकाणचे कायमचे रहीवाशी असून अर्जदार क्र. १ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ बहीन असुन अर्जदार क्र. ५ ही त्यांची आई आहे. अर्जदार का. १ ते ४ यांचे वडील व अर्जदार क. ५ यांचे पती नामे हरीचंद्र बुचाजी सुर्यवंशी हे होते ते दिनांक ०८/०६/२०२४ रोजी मोजे बनशेंडा ता. कन्नड येथे मयत झालेले आहे, त्यांचे अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस आहे. सोबत ग्राम पंचायत बनशेंद्रा यांनी दिलेले मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. अर्जदार यांना हरीचंद्र बुवाजी सुर्यवंशी यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तमेच तहसिल, प्राम पंचायत कार्यालयात मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी तसेच शासकिय व निमशासकिय योजनेचा लाभ घेण्यासाटी, वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवून येणे असे दिनांक ०१/३०/२०२५ रोजी तोंडो सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. अर्जदार क्र १ ते ५ हे मयताचे कायदेशीर वारस असुन अर्जदार क. १ ते ५ शिवाय मयतास इतर कोणीही बारस नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा, मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल. सबब हे जाहीर प्रगटन.
दिनांक ०१/१०/२०२५

**कनिष्ठ लिंपिक**
**आदेशावरुन,**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड.**

### जाहीर प्रगटन

**मा. एन.आर. ढोके. सहदिवाणी न्यायाधिश कनिष्ट स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

अर्जदार किरकोळ अर्ज क्र-४५८/२०२५
पुः तारीख ९/१२/२०२५
१. रविद्र भागाजी सातदिवे, वय-५२. वर्षे, धंदा शेती, रा. टापरगाव, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २-लताबाई भ्र. मधुकर साळवे, वय-६०, धंदा-घरकाम, रा. आकाशगंगा रहीवाशी संघ, घोडबंदर रोड, दुर्गा चौक चिंतलसर मानपाडा, ता. जि. ठाणे. ३ कडुबाई भ्र. बाबुलाल धिवर, वयः ५६, धंदा घरकाम, रा. ३. बुद्धविहारासमोर, अंबेडकर नगर, भांडुप पश्चिम, मुंबई.
गैरअर्जदार: निरंक
अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत. Bombay Regulation Act ज्या अर्थी अर्जदार यांचे वकिल ॲड. एस. ई. धनेधर यांच्या मार्फत अर्जदाराने या न्यायालयात वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराचे भागाजी चोखाजी सातदिवे हे दिनांक-१७/११/२००३ रोजी मौजे टापरगाव ता. कन्नड येथे मयत झालेले आहे तसेच अर्जदाराची आई व मयताची पत्नी तुळसाबाई ४. भागाजी सातदिवे या देखील या पुर्वीच मयत झाल्या आहेत या पुढे त्यांच्या नावाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मयत असे संबोधले जाईल. अर्जदार क. १ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क्र. २ व ३ हया मुली आहेत. अर्जासोबत ग्रामपंचायत कार्यालय मौजे टापरगाव ता. कन्नड यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे मयतांच्या नावाने मिळणारे शासकीय व निमशासकीय फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या ग्रामपंचायत महसुल दप्तरी नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला वारसाचे नावाची नोंद घेणेसाठी अर्जदारास वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे व ईतरही कायदेशीर कामासाठी सदरील वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे. ज्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत होवुन मिळण्या बाबत अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे. सबब या जाहीर प्रगटनाद्वारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कोणाचाही आक्षेप उजर असल्यास सदर जाहीर प्रगटण वर्तमाण पत्रात प्रकाशित झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीशा किवा रीतसर वकिला मार्फत आवश्यक कागदपत्रासह आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयताचे कायदेशिर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक ०९/११/२०२५ रोजी माझे सही निशी व मा.न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
दिनांक १५/११/२०२५

**आदेशावरुन**
**सहाय्यक अधिक्षक, सहदिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, कन्नड**

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब. क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. ७८३/२०२५

अर्जदार : १) रिजवाना खलील पठाण, वय ३४ वर्षे, धंदा, घरकाम, रा.गुरुधानोरा, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद, २) शबनम खलील पठाण, वय १३ वर्षे, धंदा, शिक्षण, अ.पा.क.आई अर्जदार क. १ नामे रिजवाना खलील पठाण, रा. गुरुधानोरा, ता.गंगापूर जि. औरंगाबाद. ३) तहुरा खलील पठाण, वय १० वर्षे, धंदा, शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार क. १ नामे रिजवाना खलील पठाण, रा. गुरूधानोरा, ता.गंगापूर जि. औरंगाबाद ४) सरफराज खलील पठाण, वय ६ वर्षे, धंदा, शिक्षण, अ.पा.क.आई अर्जदार क. १ नामे रिजवाना खलील पठाण, रा. गुरुधानोरा, ता.गंगापूर जि. औरंगाबाद, ५) हिरेखा अमीरखान पठाण, वय ७० वर्षे, धंदा, शेती, रा. गुरुधानोरा, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद. ६) दौलतबी हिरेखा पठाण, वय ६५ वर्षे, धंदा, घरकाम, रा. गुरुधानोरा, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद.
गैरअर्जदार :- निरंक
प्रकरण:- वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत
याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, खलील हिरेखा पठाण हे मौजे गुरुधानोरा ता. गंगापुर येथील रहीवासी होते व ते दि. १९/०९/२०२५ रोजी मौजे गुरुधानोरा ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. अर्जदार क. १ ते ६ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे खलील हिरेखा पठाण यांना अर्जदार क. १ ही पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हया अज्ञान मुली असून अर्जदार क. ४ हा अज्ञान मुलगा आहे तसेच अर्जदार क. ५ हे मयत खलील हिरेखा पठाण यांचे वडील असून अर्जदार क. ६ ही मयत खलील हिरेखा पठाण यांची आई आहे. या व्यतिरिक्त मयत खलील हिरेखा पठाण यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ६ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिलामार्फत आक्षेप , उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन दिनांक :- २८/ ११/ २०२५

**आदेशावरून**
**सहाय्यक अधिक्षक, दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर.**

## अग्रलेख...

# निर्धास्त, सुस्त आणि व्यस्त

व्यक्ती, समाज, सरकार किंवा कोणत्याही यंत्रणांच्या कार्यकाळातील शांततेचा काळ हा त्यांच्यासाठी सर्वाधिक कसोटीचा काळ असतो असे म्हणतात. सारे काही स्वस्थ आहे, आश्वस्त आहे, कोणत्याही प्रकारच्या चिंतेचे, काळजीचे किंवा सावधगिरीचे कोणतेही कारण नाही, असा निर्धास्ततेचा काळ म्हणजे शांततेचा काळ असला, तरी तो सुस्ततेचा काळ नसतो. लष्करासारख्या यंत्रणा केवळ युद्धकाळातच सतर्क आणि कार्यमग्न असतात असा सर्वसाधारण समज असतो. पण तो संपूर्ण खरा नाही. उलट, शांततेच्या काळात लष्करे अधिक कार्यमग्न असतात. या काळात लष्कर केवळ युद्धाची वाट पाहात स्वस्थ बसत नाही. उलट हा काळ लष्करासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. या काळात भविष्यातील रणनीतीची आखणी, त्या दृष्टीने सैन्याचे प्रशिक्षण, सैनिकांची मानसिक मशागत, तांत्रिक बाबींची पूर्तता, नव्या युद्धनीतीचा अभ्यास, नव्या शस्त्रास्त्रांची जुळवाजुळव आणि प्रत्यक्ष मैदानात उतरल्यानंतर करावयाच्या कृतींचा सराव अशा अनेक गोष्टी जेव्हा शांततेच्या काळात सातत्याने केल्या जातात, तेव्हा प्रत्यक्ष युद्धकाळात हे सैन्य सक्षमपणे त्यास सामोरे जात असते.

पण, सर्वांनाच शांततेच्या काळात व्यस्त राहण्याचे महत्त्व माहीत असते असे मात्र नाही. शांततेच्या काळात करण्यासारखे काहीच नसते हीच ज्यांची समजूत असते, ते सर्व जण सुस्तावलेलेही असतात आणि युद्धभूमीवर उतरण्याची वेळ आली की त्यांना खडबडून जाग येते, शांततेच्या काळातील सुस्ती उतरली तरी प्रत्यक्ष कृतीच्या काळात काय करावे हे सुचेनासे होते आणि घाईगडबडीत जे काही सुचेल ते करण्याची वेळ येते. त्याच्या परिणामांची कल्पनाही नसताना काहीतरी करावे एवढेच ज्यांना माहीत असते, त्यांचा 'ठाकरे' होतो असे म्हणण्याची वेळ आता आली आहे. गेल्या काही वर्षांपासून राज ठाकरे यांच्या राजकारणातील बराचसा काळ हा सुस्ततेचाच होता. म्हणजे, निवडणुका आल्या की त्यांचा पक्ष हातपाय हलवू लागतो आणि त्या काळात जे काही राजकारण करण्याची संधी समोर चालून येईल, त्यावर झडप घालण्याचे राजकारण केले जाते असाच राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा इतिहास दिसतो. म्हणूनच, शांततेच्या काळात सुस्त आणि निवडणुकांच्या काळात व्यस्त असा त्यांचा खाक्या असतो. मुळात, ठाकरे परिवाराची आजची पिढी हीच अपघाताने राजकारणात उतरलेली पिढी असल्याने, त्यांच्या राजकारणाचा बाजही वातकुक्कुटासारखाच आहे. म्हणजे, वाऱ्याच्या दिशेने पाठ फिरवायची आणि त्याच दिशेने बांग द्यायची असा बाज या कुटुंबातील या पिढीच्या राजकारणाने स्वीकारला आहे. केवळ बाळासाहेब ठाकरे यांच्या राजकारणाचा वारसा एवढीच त्यांच्या राजकारणाची पुंजी असल्याने, चालून आलेले नेतृत्व एवढीच त्यांची कमाई आहे. या संधीचा नेमका फायदा उठविण्यासाठी त्यांनी काही मोठे कर्तृत्व दखविल्याचा ठोस पुरावा तर नाहीच, उलट, बाळासाहेबांची पुण्याई पाठीशी नसती तर आपण शून्यवत आहोत, ही जाणीवही त्यांना आहे. उद्धव ठाकरे यांनी तसे काही वेळा कबूलही केले आहे. राज ठाकरे यांच्याही पाठीशी बाळासाहेबांचीच पुण्याई असली तरी नेतृत्व सिद्ध करण्याची संधी त्यांच्यासमोर अनेकदा उभी राहिली होती. मुळात आपले व्यक्तिमत्त्व आता जे दिसते तसेच आहे, की याहून वेगळे आहे, आपले नेतृत्व खरे आहे की बेगडी आहे याविषयी त्यांच्याही मनात काहीसा संभ्रम असावा, असेही दिसून आले आहे. 'मला अस्सल राज ठाकरे व्हायला भाग पाडू नका' असा एक सज्जड इशारा त्यांनी काही वर्षांपूर्वी आपल्याच कार्यकर्त्यांना दिला होता. तेव्हापासून ते ज्या रूपात वावरत आहेत, ते खरे राज ठाकरे, की त्यांचे याहून काही वेगळे रूप आहे हे त्यांच्या कार्यकर्त्यांसही उमगलेले नाही. म्हणूनच, राजकारणाच्या रणांगणात उतरण्याची वेळ आली की हाती येईल ते शस्त्र परजून सिद्ध होण्याची वेळ त्यांच्यावर वारंवार येते असे वारंवार स्पष्ट झालेले आहे.

बाळासाहेब ठाकरे यांच्या राजकारणाचा वारसा म्हणून या बंधूंच्या हातात मिळालेले एक असेच शस्त्र आता निवडणुकांच्या रणधुमाळीत त्यांनी परजले आहे. काही शस्त्रांचा वापर केला नाही तर त्यांना गंज चढतो. त्यांची धारही कमी होते आणि अशी बोथट शस्त्रे हवेत फिरवावी लागली तर त्यांचा उपयोगही होत नाही. याआधी त्यांनी अनेकदा ते हवेतच चालवलेले असल्याने त्या शस्त्राचा प्रभावही फारसा राहिलेला नाही. पण ऐनवेळी, शांततेच्या काळात भावी संघर्षाच्या तयारीसाठी कार्यमग्न राहण्याऐवजी हाती असलेल्या हत्याराच्या भरवशावर मैदानात उतरण्याच्या विश्वासामुळे त्यांनी पुन्हा तेच शस्त्र हवेत फिरविण्यास सुरुवात केली आहे. मराठी भाषेचा मुद्दा मराठीजनांच्या गळी कोणा राजकीय नेत्यांनी उतरवावा, एवढी मराठी माणसाची मानसिकता खचीतच सुस्तावलेली नाही. मराठी ही महाराष्ट्राची अस्मिता आहे, हे तमाम मराठीजनांस पक्के ठावूक आहे आणि त्याबाबतीत त्याची अस्मिता सदैव जिवंत आणि धगधगतीदेखील राहिलेली आहे. मराठीच्या संरक्षणासाठी राजकारणाहूनही प्रभावीपणे काम करणारी अन्य क्षेत्रे महाराष्ट्रात सतत कार्यरत असतात आणि शांततेच्या काळातही त्यावर त्यांचे काम सुरू असते, हेही सिद्ध झालेले आहे. मराठी भाषेच्या जतन, संवर्धन आणि संरक्षणासाठी साहित्यक्षेत्र सजग असते, मराठीचे अभ्यासक जागरूक असतात. त्यामुळे, ठाकरे बंधूंनी मराठीचा मुद्दा उचलण्याआधीच कोणी तो राजकारणाच्या रणांगणावर केंद्रस्थानी आणून ठेवतो व ठाकरे बंधू केवळ या मुद्द्याचे आपल्या हातातील गुळगुळीत हत्यार परजून, अगोदरच जागे असलेल्या मराठीजनांस जागे राहण्याचा इशारा करू लागतात, हेही स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे, विचारांचा वारसा म्हणून हाती आलेला हा मुद्दा केवळ निवडणुकांपुरता वापरून अगोदरच जागे असलेल्या मराठीजनांस जागे करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांतील गांभीर्य आता संपले आहे. विचारांचा वारसा म्हणून या बंधूंच्या हाती असलेल्या आणखी एका मुद्द्याचे हत्यार वारंवार हवेत फिरवून त्यांनी या गंभीर मुद्द्याची धारही संपवून टाकली आहे. बॉम्बेचे मुंबई आणि मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव ही त्यांची आवडती रणनीती आहे. प्रत्येक निवडणुकांच्या तोंडावर त्याची आवई उठविली जाते आणि त्या मुद्द्याभोवती निवडणूक फिरविण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून केला जातो. मुळात, गेल्या अनेक दशकांपासून हाच मुद्दा वारंवार उठविला गेल्याने व तसे काहीच होणार नसल्याची ग्वाही आताच्या व याआधीच्या प्रत्येक सरकारने दिलेली असल्याने, हा मुद्दादेखील आता गुळगुळीतच झाला आहे. मराठी माणसाला जागे करण्यासाठी आपण राजकारण करतो, असा त्यांचा असाच एक समज आहे. पण मुळात मराठी माणूस त्यांच्या राजकारणामुळे नव्हे, तर त्याच्या परंपरा, अस्मिता आणि जाणिवांमुळे सतत जागाच राहिलेला आहे. म्हणूनच, तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती करण्याबाबतच्या मुद्द्यावर ठाकरे बंधूंच्या अगोदरही, मराठीप्रेमींनी त्याविरोधात संघर्ष सुरू केला होता.

मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याची आवई हा कपोलकल्पित राजकारणाचा भाग आहे हे माहीत असूनही, जेव्हा जेव्हा ही आवई उठविली जाते तेव्हा तेव्हा त्याचे निःसंदिग्ध निराकरण केले जाते, त्याचे कारणदेखील मराठी माणूस जागा आहे हेच आहे. असा कोणताही प्रयत्न महाराष्ट्रात सहन होणार नाही आणि या मुद्द्याचे राजकारण करणाऱ्यांच्याही अगोदर मराठी जनता त्याविरोधात संघर्षास सिद्ध होईल याची पुरेपूर साक्ष इतिहासाने देऊन ठेवलेली आहे. संयुक्त महाराष्ट्राचा संघर्ष हा त्या जाणिवेचाच आविष्कार होता. त्यामुळे, मुळातच जागा असलेल्या मराठी माणसास जागे राहण्याचे इशारे निवडणुकीच्या राजकारणात चालणार नाहीत. राजकारण करावयाचे असेल तर त्यासाठी पूर्ण वेळ द्यावा लागतो, उशिरापर्यंत झोपून चालत नाही असा एक खोचक इशारा एका ज्येष्ठ राजकीय नेत्याने राज ठाकरे यांनाच दिला होता. राज ठाकरे हे फावल्या वेळातील राजकारणी आहेत, असा तेव्हापासून महाराष्ट्रातील अनेकांचा समज आहे. म्हणूनच, जे नेते पूर्णवेळ राजकारण करत नाहीत, शांततेचा काळ सुस्ततेत घालवितात, जे स्वतःच झोपून राहतात, त्यांनी इतरांस जागे राहण्याचा सल्ला देणे हाच एक विनोद असतो. राजकारणात असे विनोद घडतच असल्याने तेदेखील आता गुळगुळीत होऊन गेले आहेत.

## प्रासंगिक

# डिजिटल इंडिया ते स्मार्ट इंडिया

**प्रा. डॉ. स्वाती महेश जोशी**

**(बाबाजी दाते महाविद्यालय यवतमाळ येथे शनिवार, २९ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित राष्ट्रीय परिषदेनिमित्त...)**

आजच्या वेगाने बदलणाऱ्या युगात ''डिजिटल इंडिया'' ही केवळ घोषणा नसून, संपूर्ण समाजव्यवस्था बदलून टाकणारी एक मोठी चळवळ बनली आहे. या चळवळीमुळे शिक्षण, उद्योग, संशोधन, कला, व्यवस्थापन, पर्यावरणशास्त्र या क्षेत्रांत अभूतपूर्व परिवर्तन घडत आहे. अशा काळात ''डिजिटल इंडिया टु स्मार्ट इंडिया : ए मल्टिडिसिप्लिनरी स्टडी ऑफ एज्युकेशन, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स ॲण्ड सस्टेनेबल डेव्हलपमेंट'' या विषयावर राष्ट्रीय पातळीवरील परिषद आयोजित करणे अत्यंत योग्य आणि दूरदर्शी पाऊल आहे.

मी स्वतः संगीत विभागातील प्राध्यापिका असल्यामुळे, तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या नव्या शक्यता आणि आव्हाने यांचा थेट अनुभव मला दररोज येतो. त्यामुळे अशा परिषदांचे महत्त्व मला अधिक ठळकपणे जाणवते.

आज उद्योगक्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), विदा विश्लेषण, डिजिटल सेवा, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) अशा संकल्पनांचा वेगाने वापर वाढत आहे. उद्योगक्षेत्राला नव्या पिढीतील विद्यार्थ्यांकडून सृजनशील विचार, डिजिटल कौशल्ये, बहुआयामी अभ्यास, समस्यांचे त्वरित समाधान आणि तंत्रज्ञान-आधारित दृष्टिकोन अपेक्षित आहे. शैक्षणिक जगताला मात्र उद्योगाच्या या गतीशी सातत्याने ताळमेळ साधणे कठीण जाऊ शकते. भविष्यातील ही दरी कमी करणाऱ्या परिषदांची गरज आणि महत्त्व या ठिकाणी अधोरेखित होते.

कौशल्य आणि मूल्याधारित शिक्षणावर भर देत शाश्वत विकास साधने भविष्यात सोपे जाणार आहे. त्यामुळे शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, कला, सामाजिक शास्त्र, विज्ञान आणि तंत्रज्ञान या सर्वांमधील नैसर्गिक दुवे शोधून काढणे हा एक प्रमुख दृष्टिकोन या उपक्रमांमध्ये असणे आवश्यक आहे.



उच्चशिक्षण, उद्योगक्षेत्रातील गरजांशी सुसंगत संशोधन काय असावे, याविषयी मार्गदर्शन अशा परिषदांतून होणे अपेक्षित आहे.

संगीत क्षेत्र सुद्धा तंत्रज्ञानापासून दूर राहिलेले नाही. आज प्रत्येक संगीत विद्यार्थी, कलाकार, अध्यापक सर्व जण डिजिटल विश्वाशी जोडले गेले आहेत. रियाज ॲप्स, एआय आधारित स्वर विश्लेषण, कंपोझिशन सॉफ्टवेअर, डिजिटल तबला-तानपुरा, ऑनलाईन गुरुकुल प्रणाली यामुळे संगीत शिक्षणात क्रांती घडत आहे. या बदलांसोबत अनेक तंत्रज्ञानविषयक धोके सुद्धा उद्भवत आहेत, ज्यामध्ये शास्त्रीय व शुद्ध कलेला कुठेतरी मागे खेचले जात आहे. त्यामुळे या परिषदेच्या माध्यमातून तंत्रज्ञान व कलेची शुद्धता यांचा योग्य सुवर्णमध्य कसा गाठता येईल हे शोधले जावे.

ज्ञान हे व्यक्तिपुरते नसावे, तर ते समाजाचे सामूहिक संपत्ती असावे. पण आज माहिती इतक्या वेगाने बदलते की ज्ञानाची परंपरा निर्माण करण्यासाठी संशोधकांचे सतत संपर्कात राहणे अत्यावश्यक झाले आहे. या परिषदेमुळे विद्यापीठे व महाविद्यालयांतील शिक्षकसंशोधक एकत्र येतील, नवीन तंत्रज्ञानांच्या संदर्भात मूल्याधारित चर्चा होईल आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थी व संशोधकांना संशोधन संस्कृतीची प्रेरणा मिळते.

या परिषदेचा आधार असलेली पीएम-यूएसएचए (प्रायमिनिस्टर-उच्चतर शिक्षा अभियान) ही केंद्र सरकारची महत्त्वपूर्ण योजना आहे. पीएम-यूएसएचएमुळे महाविद्यालयांना स्मार्ट क्लासरूम्स, डिजिटल लॅब्स, संशोधन प्रकल्प, प्रशिक्षण कार्यक्रम यांसाठी मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळते. या महत्त्वाकांक्षी योजनेच्या पाठबळामुळे दाते कॉलेजला ही परिषद राष्ट्रीय स्तरावरील विद्वानांसह आयोजित करता येत आहे. सांगताना अत्यंत अभिमान वाटतो की, पीएम-उषा योजनेच्या अंतर्गत आमच्या बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालयात अत्यंत काटेकोरपणे या योजनेची अंमलबजावणी होत असून त्या निधीचा उपयोग बांधकामासह महाविद्यालयाच्या सर्व विभागांना अत्याधुनिक करण्याचा स्तुत्य उपक्रम संस्था राबवीत आहे.

आमच्या महाविद्यालयाची शैक्षणिक वाटचाल ही नेहमीच प्रगतशील आणि विद्यार्थिकेंद्रित राहिली आहे. १९५९ मध्ये केवळ १४५ विद्यार्थ्यांनी सुरू झालेल्या या संस्थेने आज २१००+ विद्यार्थ्यांपर्यंतचा प्रवास केला आहे, ही मोठी कामगिरी आहे. महाविद्यालयामध्ये प्रशस्त व आधुनिकीकरण केलेले ग्रंथालय, उत्कृष्ट प्रयोगशाळा, इनडोअर-आऊटडोअर जिम्नॅशियम, संगीत विभागासाठी स्वतंत्र कक्ष, मुलींसाठी वसतिगृह, एनसीसी-एनएसएस अशा अनेक सुविधा आहेत, ज्यामुळे विद्यार्थी बहुआयामी प्रगती करतात.

या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे राज्यभरातून ३०० हून अधिक संशोधक, विद्यार्थी, उद्योगक्षेत्रातील व्यक्ती या चर्चासत्रामध्ये सहभागी होत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात संशोधनपर संवाद घडवून आणणे हे शिक्षणसंस्थेच्या शैक्षणिक बांधिलकीचे प्रमाण आहे.

ज्ञान, तंत्रज्ञान आणि शाश्वत विकासाचा संगम म्हणजेच स्मार्ट भारताचा पाया आहे. भारताला प्राचीन परम वैभव प्राप्त करून देण्यासाठी अशा प्रकारच्या चर्चासत्रांमधून सखोल चिंतन मंथन होवो, हाच या परिषदेचा एक उद्देश आहे.

(संगीत विभाग, बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ.)

## वेध

**- ॲड. विजय रामचंद्र देशपांडे, सोलापूर**

# नवीन कामगार कोड यांची तोंडओळख

नवीन कामगार कायद्यांनुसार ग्रॅच्युइटी आणि भविष्य निर्वाह निधी बाबतच्या नियमांमध्ये महत्त्वाचे बदल झाले आहेत. हे बदल प्रामुख्याने नवीन वेतन संहिता आणिसामाजिक सुरक्षा संहिता या नवीन कामगार संहितेच्या अंमलबजावणीमुळे आले आहेत.

**ग्रॅच्युइटी आणि पीएफ संबंधी प्रमुख नवीन नियम**

**१. वेतनची बदललेली व्याख्या**

नवीन नियमांनुसार वेतनाची व्याख्या बदलण्यात आली आहे. कंपनीच्या एकूण खर्चापैकी किमान ५०%रक्कम मूळ वेतन आणि महागाई भत्ता असणे अनिवार्य केले आहे. या नियमामुळे, पीएफ आणि ग्रॅच्युइटीची गणना ज्या मूळ वेतनावर होते, त्याची रक्कम वाढेल.

परिणाम: कर्मचारी आणि कंपनी दोघांचेही पीएफ आणि ग्रॅच्युइटीमध्ये योगदान वाढेल. यामुळे निवृत्तीनंतर मिळणारी एकूण रक्कम वाढेल, पण कर्मचाऱ्याच्या हातात येणारा मासिक पगार किंचित कमी होऊ शकतो, कारण जास्त रक्कम पीएफ आणि ग्रॅच्युइटीसाठी वळवली जाईल.

**२. ग्रॅच्युइटीसाठी पात्रता कालावधीत बदल हा सर्वात महत्त्वाचा बदल:**

फिक्स्ड-टर्म कर्मचारी: निश्चित कालावधीच्या करारावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी, ग्रॅच्युइटीसाठी आवश्यक असणारा ५ वर्षांचा सतत सेवेचा कालावधी आता केवळ १ वर्षांवरआणला आहे.

फायदा: अनेकदा नोकरी बदलणाऱ्या किंवा विशिष्ट प्रोजेक्टसाठी काम करणाऱ्या फिक्स्ड-टर्म कर्मचाऱ्यांना आता लवकर ग्रॅच्युइटीचा लाभ मिळू शकेल. त्यांना स्थायी कर्मचाऱ्यांप्रमाणेच इतर फायदे मिळतील.

**३. कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी नियम**

नवीन नियमांनुसार, कंत्राटी कामगारांनासुद्धा स्थायी कर्मचाऱ्यांप्रमाणेच ग्रॅच्युइटी आणि सामाजिक सुरक्षा (, आरोग्य विमा लाभ मिळतील.

लक्षात ठेवण्यासारख्या इतर गोष्टी

**नियुक्ती पत्र** : प्रत्येक कर्मचाऱ्याला गिग कामगार वगळता (झोम्याटो, स्विगी, ब्लिकीट यांचे डिलीव्हरी बॉय व त्यासारखी कामे करणारे कर्मचारी) नोकरीचे औपचारिक नियुक्ती पत्र देणे आता अनिवार्य केले आहे, ज्यात पगार आणि सामाजिक सुरक्षा लाभांचा तपशील असावा.

**वेळेवर वेतन** : पगार मिळण्यास विलंब झाल्यास कंपनीला दंड भरावा लागेल, ज्यामुळे कर्मचाऱ्यांच्या वेतनाची सुरक्षा वाढली आहे.

**ओव्हरटाईम** :ओव्हरटाईम नेहमी स्वैच्छिक असेल आणि त्याचे पेमेंट दुप्पट दराने करावे लागेल.

**स्त्री कामगार**: योग्य सुरक्षा व्यवस्था असल्यास महिलांना रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करण्याची परवानगी दिली आहे.

या बदलांमुळे कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर मोठा आर्थिक लाभ मिळण्याची शक्यता आहे, पण त्यांच्या पगाराची रचना बदलल्यामुळे टेक-होम सॅलरी किंचित कमी होऊ शकते.

**मो. ९३२६१ ६१७९३**

## दखल

# भाजपा, ठाकरे आणि निवडणुका

**मोरेश्वर बडगे**

चॅनेलवाल्यांना ब्रेकिंग न्यूज हवी असते. त्यासाठीच सनसनाटी बातम्या चालविल्या जातात. सारं कसं आलबेल दाखवलं तर ते कोण पाहणार, हा चॅनेलवाल्यांपुढे प्रश्न असतो. त्यामुळे ब्रेकिंग न्यूज तयार केल्या जातात. अलिकडे आपल्याकडे हेच सुरू आहे. ते तर बरे की, तो भांडुपचा भोंगा म्हणजे संजय राऊत बंद आहे. दररोज सकाळी नसलेल्या गोष्टींचा रतीब राऊत घालत होते. ते आजारी आहेत. त्यामुळे भोंगा बंद आहे. पण म्हणून खोट्या बातम्या रंगवण्याचा उद्योग बंद पडलेला नाही. तो सुरूच आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात नसलेली भांडणं रंगवण्याचा खेळ चालला. फडणवीस आणि शिंदे यांच्यात कसा अबोला आहे ते दाखवले गेले. त्यासाठी सोयीस्कर क्लिप्स दाखवल्या गेल्या. याच दरम्यान शिंदे यांच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकला. एकनाथ शिंदे अचानक केंद्रीय मंत्री अमित शाह यांना भेटायला दिल्लीला गेले. त्यामुळे तर खोट्या बातम्यांचा बाजार चांगलाच पेटला. लोकांना उल्लू बनवण्याची चॅनेलवाल्यांची ही धडपड आणखी बराच काळ चालली असती, पण फडणवीसांनी टाचणी मारली. हे चांगलेच झाले. या प्रकाराला फडणवीसांनी 'वेड्यांचा बाजार' असे संबोधले आहे. पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले, ''आमच्यात दुरावा नाही. मात्र काही माध्यमं वेडी झाली आहेत. जे दाखवत आहेत तशी कुठलीही परिस्थिती नाही. चुकीचे चित्र रंगवणारे तोंडावर पडतील. शिंदे यांच्यासोबत माझा चांगला संवाद आहे. आम्ही भेटतो, बोलतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आम्ही महायुती म्हणून लढत आहोत. काही जागी मैत्रीपूर्ण लढती आहेत. पण निकालानंतर आम्ही महायुती म्हणून एकत्र येऊ.'' फडणवीसांच्या या खुलाशानंतरही चिमटे काढणं सुरू आहे. याला 'अजेंडा पत्रकारिता' म्हणतात. भाजपाच्या म्हणजेच महायुतीच्या विरोधकांनी या 'अजेंडा पत्रकारितेला' अस्त्र बनवलं आहे. त्या माध्यमातून लोकांमध्ये भ्रम पसरविणे सुरू असते. विरोधी नेते जनतेत फिरताना कमी दिसतात. मीडियामध्ये दाखविण्यात येणाऱ्या गोष्टींवर ते खूश आहेत. महायुतीतील भांडणांमध्ये देवेंद्र सरकार कोसळून पडणार आणि मग आपली सत्ता येणार अशा मानसिकतेत विरोधी पक्ष आहेत. याच मानसिकतेने नुकत्याच झालेल्या बिहारच्या निवडणुकीत तेजस्वी यादव यांच्या महागठबंधनचा दारुण पराभव झाला. तेजस्वी यादव यांच्या प्रचार सभांपूर्वी काही गाणी वाजवली जात होती. ती गाणी वाजत होती तेव्हा यादव यांना गुदगुल्या होत होत्या. मात्र आता त्या गाण्यांनी आपला घात केला, असे यादव यांना वाटते आहे. तिकडच्या ४०० गायक आणि युट्युबर्सना तेजस्वी यादव यांनी नोटीस दिली आहे. प्रचार चुकीच्या दिशेने गेला तर काय होते ते बिहारने दाखवून दिले. बिहारच्या रणधुमाळीत काँग्रेसचे युवराज विदेशात गेले होते. काँग्रेसचा बँडबाजा वाजला. प्रशांत किशोर हे रणनीतिकार म्हणून प्रसिद्ध आहेत. नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान बनण्यासाठी त्यांनीच रणनीती बनवून दिली होती. मात्र, या प्रशांत किशोर यांच्या पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही. सध्या आपल्याकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकांसाठी बिहारचे निकाल बरेच मार्गदर्शक ठरू शकतात.



फाजील आत्मविश्वास धोका देतो. राजकारण हा आता 'पार्ट टाईम' खेळायचा विषय राहिलेला नाही. भाजपा २४ तास आणि १२ महिने राजकारण करतो म्हणून त्याला चांगले रिझल्ट मिळतात. झटपट यश कमावू पाहणाऱ्यांचा 'उद्धव ठाकरे' होतो. उद्धव ठाकरेंनी एका मिनिटात महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद मिळविले. पण वडिलांनी ४० वर्षे मेहनत करून उभा केलेला शिवसेना पक्ष अडीच वर्षांत संपवला. उद्धव आज एकदम रिकामे आहेत. त्यांच्या हातचा पक्ष गेला, निवडणूक चिन्ह गेले. आमदार गेले ते वेगळे. आता मुंबई महापालिकेची निवडणूक कशी लढवायची ही त्यांची चिंता आहे. काँग्रेसने स्वबळाचा नारा दिला आहे. लोकसभा आणि त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी या नात्याने काँग्रेस त्यांच्यासोबत होती. त्यामुळे मुस्लिम आणि दलितांची मतं त्यांना मिळाली. त्या जोरावर मुंबईतल्या विधानसभेच्या १० जागा ठाकरे सेनेने जिंकल्या. पण आता काँग्रेस सोबत नाही म्हटल्यावर मुस्लिम आणि दलित मतांना विसरायचे, या कल्पनेनेही त्यांना घाम फुटतो आहे. ठाकरे बंधू एकत्र लढतील, अशी जोरदार चर्चा आहे. पण मनसे सुप्रीमो राज ठाकरे युतीबाबत अजून बोलले नाहीत. मुंबईच्या वरळी डोममध्ये महाराष्ट्र हिताच्या नावाने ठाकरे बंधू एका व्यासपीठावर आले होते. त्या गोष्टीला आता चार महिने झाले. पण राज ठाकरेंनी अजून युतीचा शब्दही जिभेवर आणला नाही. त्यामुळे राज यांच्या मनात नेमके आहे तरी काय, असा प्रश्न शिवसैनिकांना पडला आहे. काँग्रेस नाही, राज ठाकरे यांचेही काही खरे नाही. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीची मुंबईत फारशी ताकद नाही. अशा हवेत भाजपा बाजी मारून जाईल, याचे टेन्शन उद्धव ठाकरे यांना आले आहे. त्यामुळे त्यांनी आता मराठी अस्मितेसोबत 'ठाकरे ब्रँड'चा जप चालवणे सुरू केले आहे. मुंबईचा महापौर मराठी असेल असे सांगत उद्धव सुटले आहेत. पण 'ठाकरे बंधू' म्हणजे मराठी हे सूत्र कुठून आणले? भाजपाचा महापौर झाला तर तो मराठी नसेल हे कुणी सांगितले? शिवसैनिकाला मुख्यमंत्री करेन असे वचन वडिलांना दिले होते, असे उद्धव सांगतात. प्रत्यक्षात त्यांना स्वतःला मुख्यमंत्री व्हायचे होते. शिवसैनिकांसाठी मागायचे आणि ठाकरेंनी घ्यायचे असा गेम झाला. मात्र, संधी मिळताच भाजपाने शिवसैनिकाला मुख्यमंत्रिपद दिले. भाजपाने एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करून शब्द पूर्ण केला. उद्धव ही दानत दाखवू शकले नाहीत. त्यामुळे आता ठाकरे बंधूंच्या गोटातील माणूस म्हणजेच मराठी हे समीकरण लोकांना पचणार नाही. देवेंद्र फडणवीस यांनी हा इशारा फार पूर्वी उद्धव यांना दिला होता. 'तुम्ही म्हणजे मुंबई नाही, तुम्ही म्हणजे महाराष्ट्र नाही, तुम्ही म्हणजे मराठी माणूस नाही' ह्या शब्दात फडणवीस यांनी उद्धव यांना वाजवले होते. भाजपा दीर्घकालीन राजकारण करतो, सुडाचे राजकारण करीत नाही हे फडणवीसांनी दाखवून दिले. उतावळ्या उद्धवना ते जमले नाही. त्यामुळे ते शिवसेना बुडवून बसले. भविष्य तर आणखी कठीण आहे. असदुद्दीन ओवेसी यांच्या एमआयएम पक्षाचेही आव्हान असणार आहे. समाजवादी पक्षाचे अबू आझमी यांच्या जोडीला मुस्लिम मतदारांना आणखी एक पर्याय उपलब्ध झाला आहे. मुंबईमध्ये १५ टक्के मुस्लिम मतदार आहेत. एमआयएम मुस्लिम मतं फोडेल. यात काँग्रेसचे मोठे नुकसान होणार आहे. मुंबईमध्ये ३५ टक्के मराठी मतदार आहे. या मोठ्या व्होट बँकेचे तीन तुकडे पडतील. या भाऊगर्दीत भाजपा आणि त्याची महायुती हीच चांगल्या परिस्थितीत दिसत आहे. मुंबईची निवडणूक भाजपाने प्रतिष्ठेची केली आहे. मुंबईचा महापौर महायुतीचाच असेल, असे फडणवीस सांगत आहेत. मुंबईच्या लढाईत भाजपाला एकनाथ शिंदे यांच्या सेनेची मदत होणार आहे. जुने ६५ नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्याकडे आले आहेत. मुंबईत महायुती शंभरावर जागा जिंकत आहे, असा एक सर्व्हे नुकताच पुढे आला आहे. सध्या सुरू नगर परिषद निवडणुकीत भाजपा बल्लेबल्ले आहे. भाजपाचे १०० पेक्षा अधिक नगरसेवक अविरोध निवडून आले आहेत. तीन शहरात अविरोध आलेले नगराध्यक्ष भाजपाचे आहेत. प्रभावी रणनीतीचा भाजपाला फायदा होताना दिसत आहे.

९८२२२६२७३५

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## आजचे संघगीत-९६

शुक्रवार, २८ नोव्हेंबर २०२५

### चिरविजयाचे वारस आम्ही

कर्तव्याचे पूजक आम्ही चिरविजयाचे वारस आम्ही ॥धृ.॥

व्यक्तिसुखाचे पाश तोडुनी, ध्येयपथावर युवक चालले
अविरत अमुच्या तपस्येतुनी, संघटनेचे तत्त्व उदेले
संघटनेचे सेवक आम्ही ॥१॥

समाजसेवा ब्रीद आमुचे स्वार्थ सुखाची आस नसे
थोर कारणी देह वहावा एक मात्र हा ध्यास असे
ध्येय पथावर सैनिक आम्ही ॥२॥

खडतर असले वाण घेतले स्वेच्छेने तर आम्ही आमुच्या
या भूमीचे भाग्य अखेरी प्रयत्नातुनी घडेल आमुच्या
पराक्रमाचे पाइक आम्ही ॥३॥

तमा न आम्हा कळिकाळाची केवळ अमुचे कार्य करू
कर्तव्याचे पूजक आम्ही ध्येयास्तव या जगू मरू
चिरविजयाचे वारस आम्ही ॥४॥

### अयोध्येत धर्मध्वज : सनातन संस्कृतीचा गौरवशाली क्षण

मार्गशीर्ष शुक्ल पंचमी अर्थातच, २५ नोव्हेंबर २०२५ या पवित्र दिवशी अयोध्येतील मंदिराच्या कळसावर धर्मध्वजाची स्थापना झाली. ध्वज हे राष्ट्राच्या अस्तित्वाचे आणि संस्कृतीच्या अभिमानाचे सन्मानचिन्ह आहे. ५०० वर्षांच्या संघर्षानंतर धर्मध्वजाची स्थापना होणे हा प्रत्येक भारतीयांसाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. प्रभू श्रीरामांच्या सैन्यध्वजाप्रमाणे दैवी कोविदार वृक्ष, सूर्यवंशी रघुवंशाचे प्रतीक असलेला तेजोमय सूर्य आणि ब्रह्मांडाचे बीजाक्षर 'ॐ' यांची नक्षी असलेला हा ध्वज श्रीराममंदिराच्या कळसावर स्थापन होणे, हे भारतीय संस्कृतीचे पुनरुत्थान आहे. यातून राष्ट्रीयत्वाची भावना निश्चितच अधिक दृढ होईल. रामराज्यात जसे सर्वांना समान न्याय मिळत होता, महिला सुरक्षित होत्या आणि प्रजेला शिस्त, नैतिकता व कर्तव्यपालनाचे भान होते, तसे आदर्श राज्य घडण्यासाठी आज प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकानेही वैयक्तिक स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. आपल्या अंतरंगात साधनेचे बीज रोवून प्रभू श्रीरामांचे आदर्श गुण आचरणात आणणे, हा खऱ्या अर्थाने सनातन राष्ट्राचा शंखनाद ठरेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

## वाचक पत्रे

### गुरुचरित्र सप्ताह

मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर सायंकाळी दत्ताचा जन्म झाला, म्हणून त्या दिवशी दत्ताचा जन्मोत्सव सर्व दत्तक्षेत्रांत साजरा होत असतो. या उत्सवापूर्वी सात दिवस गुरुचरित्राचे पारायण करण्याचा प्रघात आहे. यालाच गुरुचरित्र सप्ताह असे म्हणतात. भगवान दत्तात्रेय यांच्याशी संबंधित दत्त संप्रदायाचा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे श्री गुरुचरित्र हा होय. दत्त जयंतीपूर्वी सात दिवस दत्त भक्त (पुरुष) या गुरुचरित्र ग्रंथाचे काटेकोर नियम पाळून वाचन करतात. दत्त जयंतीला या वाचनाचे पारणे करतात. श्री गुरुचरित्र हा श्रीदत्तात्रेयाचे अवतार मानल्या जाणाऱ्या श्रीनृसिंहसरस्वती यांच्याबद्दलचा चरित्रग्रंथ आहे. सरस्वती गंगाधर रचित हा ग्रंथ दत्त संप्रदायाच्या कथा सांगणारा आहे. गुरुचरित्र या ग्रंथात एकूण ५२ अध्याय असून त्यात ७४९१ ओव्या आहेत. मंगलाचरण, गुरुभक्ती आणि गुरुप्रसाद हे या ग्रंथाचे प्रमुख विषय आहेत.

व्यक्तीपेक्षा गुरू या पदाला आणि गुरू-शिष्य या नात्याला गुरुचरित्रात महत्त्व दिलेले आढळते. अवतरणिका असे विषय या ग्रंथामध्ये आहेत. गुरूची कृपा प्राप्त करणे, ऐहिक आणि पारमार्थिक जीवनातील यश मिळविणे याचे मार्गदर्शन करणारा हा ग्रंथ आहे. श्रीपाद श्रीवल्लभ आणि नृसिंह सरस्वती ही दोघेही दत्तात्रेय यांचा अवतार मानले गेले आहेत. गुरुचरित्र या ग्रंथाचे पारायण हा दत्त संप्रदायातील महत्त्वाचा घटक मानला जातो. दररोज सकाळी स्नान करून संकल्प करावा. यासाठी कायम एकच आसन वापरावे. पारायण करणाऱ्या व्यक्तीने सात्त्विक आहार घ्यावा. दिवसभर नामस्मरण करावे. पारायण काळात घोंगडी पसरून जमिनीवर झोपावे. पारायण काळात शरीर, मन आणि बुद्धी यांची शुद्धता पाळावी. दत्त जयंतीच्या दिवशी दत्ताची मनोभावे पूजा आणि नामजप केल्यास दत्त-तत्त्वाचा अधिकाधिक लाभ मिळण्यास मदत होते. श्री दत्त ही पूर्वजांना पुढील गती देणारी देवता आहे. श्री गुरुदेव दत्त। हा दत्ताचा नामजप आणि प्रार्थना अधिकाधिक करावी. सायंकाळी दत्त स्तोत्राचे पठन करावे आणि दत्त प्रभूंची कृपा संपादन करावी.

**वर्षा आवदे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### परभणी लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत 'स्व. शैलेश आंबोरे' संघ ठरला विजेता

**परभणी,/प्रतिनिधी-** येथील तुलसी क्रिकेट अकॅडमीतर्फे आयोजित केलेल्या परभणी लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत 'स्व. शैलेश आंबोरे' या संघाने प्रथम तर 'एमके मूनलाईट' या संघाने द्वितीय पारितोषिक पटकावले.

विजेत्या संघास माजी आ. सुरेश वरपूडकर, शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, आयोजक अभिजीत मुंडे, विशाल बुधवंत, अविनाश मुंडे, बबलू टाक, सचिन पाटील, मनपाचे माजी नगरसेवक, महमूद खान, सचिन मोटे, नदीम इनामदार यांच्या उपस्थित बक्षीस वितरीत करण्यात आले. दरम्यान, येथील प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडिअमच्या मैदानावर पार पडलेल्या या क्रिकेट स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी कमिटीचे सदस्य अभिजीत मुंडे, आशिष सूर्यवंशी, शैलेश लोमटे, सागर गायकवाड, सौरभ शिंदे, अनिकेत ताटे, वाजेद खान, अभय कांबळे, अमित जोगदंड, रुद्राक्ष बाजपाई, गौरव काळे व या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाजेद खान यांनी परिश्रम घेतले.

### कळगाव येथील शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**परभणी,/प्रतिनिधी :** सततची नापिकी आणि बँकेचे कर्ज कसे फेडावे? या विवंचनेतून पूर्णा तालुक्यातील कळगाव येथील ५० वर्षीय शेतकऱ्याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी (दि. २६) सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली.

वसंतराव किशनराव सूर्यवंशी असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे. सूर्यवंशी यांच्या नावे २ एकर २० आर एवढी शेती जमीन आहे. अतिवृष्टीत सोयाबीन पिकाचे झालेले नुकसान, सततची नापिकी आणि महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे घेतलेले कर्ज कसे फेडावे? या विवंचनेत सूर्यवंशी यांनी राहत्या घरी छताच्या लोखंडी हुकास गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच ताडकळस पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक गजानन मोरे, वेदप्रकाश भिंगे, संग्राम वडजे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र ताडकळस येथे पाठविला. तेथे डॉ. शुभम चव्हाण यांनी उत्तरीय तपासणी करून शवविच्छेदन केले.

या प्रकरणी मयत शेतकऱ्याचा मुलगा नवनाथ सूर्यवंशी यांच्या फिर्यादीवरून ताडकळस पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास ताडकळसचे ठाणेदार गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक संग्राम वडजे हे करीत आहेत.

### मुंबर शिवारात १२ एकर ऊस जळून खाक; शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा तालुक्यातील मुंबर शिवारात तब्बल १२ एकर ऊस जळून खाक झाल्याची घटना बुधवारी (दि.२६) मध्यरात्री एक ते दीडच्या सुमारास उघडकीस आली. अज्ञात व्यक्तीने खोडसाळपणे ऊसाला आग लावल्याचा आरोप नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केला आहे. या भीषण आगीत सखाराम व्यंकटराव शिंदे आणि बालासाहेब ज्ञानोबा शिंदे यांच्या गट नंबर ७१ मधील ३ एकर, गोविंद माधवराव शिंदे यांच्या गट नंबर ७४ मधील ६ एकर तसेच उध्दव हरीभाऊ शिंदे व भास्कर हरिभाऊ शिंदे यांच्या गट नंबर ५३ मधील ३ एकर इतका ऊस जळून राख झाला. आगीत ऊसशेतातील पाईपसह अन्य साहित्यही नष्ट झाले. अत्यंत अल्प वेळात आगीने विक्राळ रूप धारण करून एका शेतातून दुसऱ्या शेतात वेगाने प्रसार केला. शेतकऱ्यांनी जीवाचे रान करून प्रयत्न केल्याने आणखी १० एकरातील ऊस वाचवण्यात यश आले. रात्रंदिवस मेहनत घेऊन पिकवलेला ऊस क्षणात जळून खाक झाल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून हाता-तोंडाशी आलेला घास नष्ट झाल्याची खंत शेतकरी व्यक्त करत आहेत. दरम्यान, जळालेला १२ एकर ऊस पूर्णतः उद्ध्वस्त झाल्याने हा ऊस तातडीने उचलून घ्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी कारखानदारांकडे केली आहे.

### लालसेनेद्वारे सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर बोंबाबोंब आंदोलन : जात पडताळणी समिती व्यवहाराची चौकशी करण्याची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :**येथील जिल्हा जात पडताळणी समिती कार्यालयात विद्यार्थी आणि दलित व मागासवर्गीय समाजाची पिळवणूक होत असल्याचे म्हणत जिल्हास्तरीय जात पडताळणी समितीची सखोल चौकशी करावी या मागणीसाठी लालसेनेच्या वतीने सोमवार १ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बोंबाबोंब आंदोलन करण्यात येणार आहे.

कॉ. गणपत भिसे, कॉ. अशोक उबाळे, कॉ. कोंडीबा जाधव, कॉ. किशोर कांबळे, कॉ. हेमंत साळवे, कॉ. संविधान भिसे, कॉ.तथागत झोडपे, राजेभाऊ लालझरे आणि जितेंद्र हातागळे आदींच्या शिष्टमंडळाने या अनुषंगाने मंगळवारी (दि.२५) जिल्हाधिकाऱ्यांना एक तपशीलवार निवेदन सादर केले. त्याद्वारे, जात पडताळणी कार्यालयात दाखल प्रस्तावावर तीन महिन्यात निर्णय घेणे बंधनकारक असतांना वेळेत निर्णय घेतले जात नाहीत. प्रस्ताव निकाली काढण्यासाठी त्रयस्त आणि दलालामार्फत आर्थिक देवाण घेवाण केली जाते. त्यामुळे गरजू विद्यार्थी आणि दलित व मागासवर्गीय नागरीकांची आर्थिक पिळवणूक होत आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# शेवटच्या दोन दिवसांत परभणी जिल्ह्यातील सातही नगरपालिकेत प्रचाराचा होणार धडाका

**मतदारांचे लक्ष वेधण्यासाठी नानाविधी क्लृप्त्या, सूत्रधारांसह प्रभावी उमेदवारांद्वारे प्रचंड वातावरण निर्मिती**



**परभणी,/प्रतिनिधी-** जिल्ह्यातील सातही नगरपालिकेंतर्गत विविध राजकीय पक्षांच्या नेतेमंडळींसह नगराध्यक्षपदासह सदस्य पदाच्या निवडणूक रिंगणातील प्रभावी उमेदवारांनी कुटूंबिय, सगेसोयरे, मित्र परिवार व कार्यकर्त्यांच्या भक्कम सहकार्याने आपआपल्या कार्यक्षेत्रात अल्पावधीतच प्रचंड वातावरण निर्मिती करीत मोठी रणधुमाळी उडविली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकी संदर्भात दीर्घकाळातील न्यायालयीन लढाईचा निर्णय लागल्यानंतर नगरपालिकेंतर्गत सूत्रधारांसह प्रभागी अशा इच्छुक उमेदवारांनी वेध ओळखून निवडणूकांच्या दृष्टीने मोर्चेबांधणी सुरु केली. विशेषतः आपआपल्या कार्यक्षेत्रात मतदार यादीचा अभ्यास सुरु केला. अनुकूल आणि प्रतिकूल, धर्म आणि जाती-पातीच्या मतदारसंख्येचा अंदाज घेतला. नवीन मतदार नोंदणीच्या दृष्टीने अभियान सुरु केले. नगराध्यक्षपदासह सदस्य पदाचे आरक्षण निश्चित झाल्याबरोबर त्या त्या पालिकांतर्गत या मंडळींनी नगराध्यक्ष व सदस्यपदासाठी त्या प्रवर्गातील कोणता उमेदवार सर्वार्थाने सक्षम राहील, त्या-त्या प्रभागातील जाती-पातीची समिकरणे कशी जूळविता येतील, पॅनलमधून अनुकूल अशा उमेदवारांच्या जोड्या कशा रिंगणात उतरवता येतील, या दृष्टीने जोरदार हालचाली सुरु केल्या. निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यापाठोपाठ आपल्या व्यूहरचनेसह मोर्चेबांधणीस वेग दिला. विरोधकांच्या हालचाली, पडद्याआड व पडद्यावरच्या खेळ्या ओळखून निवडणूकीच्या रिंगणात सर्वार्थाने सक्षम व प्रभावी असे उमेदवार उतरविलेसुध्दा. त्या पाठोपाठ अडचणीच्या ठरणाऱ्या उमेदवारांसह हौशा-नवशा-गवशांचा वेगवेगळ्या क्लृप्त्यांद्वारे अर्ज माघारीसाठी वेगवेगळ्या यशस्वी खेळ्या खेळल्या, अन् प्रत्यक्ष लढतीवर म्हणजे प्रचारयुध्दावर लक्ष केंद्रीत करीत या सूत्रधारांसह प्रभावी उमेदवारांनी अल्पावधीतच आपआपल्या कार्यक्षेत्रात प्रचारयुध्दात प्रचंड धमाल उडविली.

या जिल्ह्यातील सातही नगरपालिकेत स्थानिक नेतृत्वाने, सक्षम उमेदवारांनी आपलं अख्खं कुटूंबिय, सगे सोयरे व मित्र परिवारास प्रचारास जुंपले. रात्र थोडी सोंगे फार हे ओळखून आपआपल्या कार्यक्षेत्रातच ठाण मांडून रात्रीचा दिवस करीत या नेतृत्वाने सक्षम उमेदवारांनी या अल्पावधीतच मतदारांना आकर्षित करण्याकरीता प्रचाराच्या वेगवेगळ्या क्लृप्त्या, युक्त्या व पध्दती अवलंबविल्या. त्याचा परिणाम नगराध्यक्षपदाच्या कार्यक्षेत्रासह संबंधित प्रभागात अवघ्या दहा-बारा दिवसात प्रचाराने कळस गाठला. ते ते प्रभाग या मंडळींच्या या साऱ्या प्रचारयुध्दामुळे अक्षरशः ढवळून निघाले आहेत.

### सोशल मिडीयाचा वेगवेगळ्या क्लृप्त्यांद्वारे प्रभावी वापर...

या निवडणूकीत प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी सोशल मिडीयाचा वेगवेगळ्या युक्त्या, क्लृप्त्या लढवून प्रभावी वापर सुरु केला आहे. व्हॉट्सअप, फेसबुक पेज, इन्स्टाग्राम यांसारख्या प्रभावी सोशल मिडीयाचा अगदी मनसोक्तपणे प्रचाराकरीता वापर केला जातो आहे. रनिंग मॅटर, छोटे पोस्टर्स याचबरोबर व्हिडीओ क्लिपचाही मोठ्या प्रमाणावर भडिमार सुरु आहे. वेगवेगळ्या गाण्यांचा क्लिपमधून प्रचारा करीता वापर सुरु आहे.

### प्रचारयुध्दात एलईडी स्क्रिनचे रथ...

नगरपालिकांच्या या निवडणूकीत प्रमुख राजकीय पक्षांनी अत्याधुनिक साधनांचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरु केला आहे. विशेषतः प्रमुख चौकात, आपआपल्या प्रभागात मतदारांचे लक्ष वेधण्याकरीता दर्शनीय भागात मोठ मोठे एलईडी स्क्रिन उभे केले आहेत. काहींनी छोटा हत्ती या वाहनास रथाचे स्वरुप देऊन एलईडी स्क्रिन बसवले आहेत. त्याद्वारे सत्तधाऱ्यांनी केलेल्या विकास कामांचा, भविष्यातील योजनांचा तर विरोधकांनी सत्तधाऱ्यांमुळे सर्वार्थाने बकाल झालेल्या भागांच्या चित्रिकरणाच्या क्लिप दाखवून मतदारांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न सुरु केला आहे.

### डोअर टू डोअर जाण्याकरीता स्पर्धा सुरु....

या निवडणूकीत आपआपल्या प्रभागात डोअर टू डोअर पोहोचण्याकरीता सूत्रधारांसह प्रभावी उमेदवारांनी अल्पावधीतच मोठमोठ्या युक्त्या अवलंबविल्या आहेत. त्यासाठी पदयात्रा हेच एकमेव प्रचाराचे सूत्र हेरुन हे उमेदवार, त्यांचे कुटूंबिय पहाटेपासून रात्री उशीरापर्यंत घराघरातील प्रत्येक मतदारांपर्यंत संपर्क साधण्याचा आटापिटा करीत आहेत. मतदार यादीतील मतदारांशी केलेल्या संपर्काचा आढावा घेऊन उर्वरित मतदारांपर्यंत पोहोचण्याकरीता चंग बांधला जात आहे. त्यामुळे त्या त्या प्रभागात या पदयात्रा लक्षवेधी ठरल्या आहेत.

### सभा, संमेलनांना मोठा फाटा...

त्या त्या नगरपालिकांच्या कार्यक्षेत्रात प्रमुख सूत्रधारांसह प्रभावी उमेदवारांनी प्रत्यक्ष मतदारांपर्यंत पोहोचण्यासच प्राधान्य दिले आहे. सभा, संमेलनांना होणारा खर्च, त्यासाठी लागणारा मोठा वेळ, तसेच गर्दी जमविण्यासाठी कसरती, खटाटोप व खर्च ओळखूनच या मंडळींनी सभा, संमेलन टाळण्यावरच मोठा भर दिला आहे. त्याचा परिणाम या जिल्ह्यात या दहा-बारा दिवसात प्रदेश पातळीवरील अवघ्या दोन-चार मंडळींच्याच धावत्या सभा झाल्या आहेत.



## आज मतदान यंत्राचे सीलिंग

**पूर्णा ,/प्रतिनिधी-** पूर्णा नगर परिषद मधील अध्यक्ष व सदस्य पदाच्या सार्वत्रिक निवडणूक करिता प्रत्यक्ष निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. यासाठी २ डिसेंबर रोजी मतदान असल्याकारणाने मतदान यंत्रे सिलिंग करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने निवडणूक लढविणा-या उमेदवारांना मशीनची सिलिंग संदर्भात २९ शनिवार रोजी सकाळी ११:०० वाजता प्रभागनिहाय सिलिंग करण्यात येणार असल्याकारणाने अध्यक्ष व सदस्य पदाचे उमेदवार व त्याचे प्रतिनिधी यांनी मशीनची सिलिंग साठी तहसिल कार्यालयात उपस्थित राहण्याचे आवाहन निर्वाचन अधिकारी तथा तहसीलदार माधवराव बोथीकर यांनी केले आहे.

## भारतीय संविधान देशातील प्रत्येक धर्मियांचे संरक्षण करते-हत्तीअंबीरे

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी-** जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताचे संविधान हे या देशातील प्रत्येक धर्मियांचे संरक्षण करते व सर्वांना समान संधी व न्याय देते असे प्रतिपादन यंत्रमाग संस्थेचे चेअरमन वैजनाथ हत्तीअंबीरे यांनी केले.ते २६ नोव्हेंबर संविधान दिनाच्या निमित्ताने शहरातील मा ज्योतीबा फुले मागासवर्गीय यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्थेच्या वतीने कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या संविधान दिनानिमित्त बोलताना सांगितले २६ नोव्हेंबर संविधान गौरव दिनानिमित्त पालम येथील मा.ज्योतीबा फुले मागासवर्गीय यंत्रमाग सहकारी संस्थेच्या वतीने भव्य संविधान दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैजनाथराव हत्तिअंबीरे होते. प्रमुंख पाहुणे म्हणून रिपाइंचे जिल्हाध्यक्ष निव्रती हत्तीअंबीरे मा. सरपंच सुधाकर हनवते हे होते.कार्यक्रमाच्या सुरवातीला भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर व गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामुहिक वाचन केले. पुढे बोलताना हत्तीअंबीरे म्हणाले की, हजारो जाती आणि अनेक धर्म असलेल्या भारतासाठी सर्व देशवासियांना समान संधी व समान न्याय, हक्क व अधिकार देणारी राज्यघटना लिहण्याचे कठीण काम होते.हे कठीण कार्य प्रज्ञावंत व जगातील महान विद्वान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील सर्वोत्तम असे संविधान देशाला दिले.



प्रत्येक व्यक्तीला एक मत,एक मुल्य हा सर्वात मोठा अनमोल असा दागिना बाबासाहेबांनी दिलेला आहे. बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून सर्वांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना रिपाइंचे जिल्हाध्यक्ष निव्रती हत्तीअंबीरे यांनी संविधानावर आपले विचार मांडले. बाबासाहेबांनी जे हक्क आणि अधिकार दिले आहेत त्याचे संरक्षण केले पाहिजे असे सांगितले. यावेळी भगवानराव येवले, मोहण चोरमारे,माधव घोबाडे,महेश कुलकर्णी, फारुख भाई,पत्रकार शांतीलाल शर्मा,शिवाजी शिंदे धोंडीराम कळंबे, आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उन्नमेष साळवे यांनी केले.



## भारताचे संविधान जगा मध्ये श्रेष्ठ....उपगुप्त महाथेरो

**संपत तेली**

**पूर्णा ,/प्रतिनिधी-** भारताचे संविधान जगा मध्ये श्रेष्ठ आहे संविधानात सर्वानां सामाऊन घेण्याची ताकद आहे भारतीय संविधान नसते तर पाकिस्तान सारखी अवस्था झाली असती व देशाचे तुकडे झाले असते असे प्रतिपादन भतें उपयुप्त महाथेरो यांनी केले.

भारतीय संविधान अमृत महोत्सव घर घर संविधान कार्क्रम अतर्गुत पुर्णा शहरातील डॉ.आबेडकर चौकात संविधान दिन कार्क्रमाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी डॉ.उपगुप्तो महाथेरो यांनी डॉ.बाबासाहेब आबेंडकर लिखीत संविधानाचे महत्व सांगितले. बोधीसत्व डॉ.बी आर आंबेडकर स्मारक व बुध्द विहार समिती तर्फे हा कार्यक्रम आयोजित केला होता . यावेळी शहरातील राजकीय सामाजिक धार्मिक शैक्षणिच श्रेत्रातील मान्यंवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळ्यास व भारतीय संविधान या ग्रंथास पुष्पहार अर्पेण करण्यात आले .

भन्ते पयावंश यांच्या संयोजना खाली कार्क्रम संपन्न झाला. यावेळी शाहीर विजय सातोरे यांनी संविधान गीत सादर केले याप्रंसगी जेष्ठ विचारवंत प्रकाश कांबळे,संतोष एकलारे,उत्तम खंदारे,अनिल खर्गखराटे , ॲड . हर्षवर्धन गायकवाड, त्र्यंबक काबळे ,दादाराव पंडीत,अशोक कांबळे ,प्रा.गोविद कदम,साहेबराव सोनवणे,प्रा. पंडीत,जेष्ठ पत्रकार विजय बगाटे मुगाजी खंदारे,पी.जी. रणवीर, मुकुद पाटील, अमृत कर्हाळे, ,मोकीद भोळे, गौतम भोळे,श्रीकांत हिवाळे,शामराव जोगदंड आदि सह संविधान प्रेमी नागरीक सह मान्यवर उपस्थित होते.

### अवैध रेती वाहतुक करणारा ट्रॅक्टर जप्त स्थागुशाने केली कारवाई



**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सोनपेठ तालुक्यातील रस्त्यावर मैराळ-सावंगी धारासुर रोड परिसरात अवैध रेती वाहतुकीवर स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने कारवाई करत एक ट्रॅक्टर जप्त केला असून संबंधित चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनेक दिवसांपासून या परिसरात चोरट्या मार्गाने अवैध रेती वाहतूक सुरू असल्याच्या तक्रारींनंतर पोलिसांनी ही कारवाई केली. मिळालेल्या माहितीनुसार, एम.एच. २२ ए.डी. ०१४५ क्रमांकाचा ट्रॅक्टर कोणत्याही शासकीय परवानगीशिवाय धारासुर- मैराळ सावंगी रोडवरून एक ब्रास रेती वाहतूक करताना आढळून आला. पोलीस हेड कॉन्स्टेबल राहुल परसोडे व पोलिस शिपाई दिलीप निलपत्रेवार,पोशी सावंत यांनी प्रकरणात गणेश मंचकराव कदम (वय ३६,रा. मैराळ सावंगी) हा चालक असल्याचे पोलिसांनी सांगितले. स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे तत्काळ त्या परिसरात गस्त वाढवून सापळा रचला.त्यामध्ये संबंधित ट्रॅक्टर पकडण्यात आला. तपासादरम्यान चालकाकडे रेती वाहतुकीसाठी आवश्यक असणारे मंजुरी आदेश,रॉयल्टी पावती किंवा शासन मान्यता आढळली नाही.त्यामुळे संबंधित ट्रॅक्टर व रेती ताब्यात घेण्यात आली.सदरची कारवाई स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग भारती यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली
या प्रकरणी आरोपीवर सोनपेठ पोलीस स्थानकात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२)अन्वये (चोरीचा गुन्हा)गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास सोनपेठ पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अशोक गीते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहेत. सोनपेठ तालुक्यातील गोदाकाठच्या अनेक गावातून अवैध रेती उत्खनन आणि वाहतूक वाढल्याने पर्यावरणीय हानी होत असल्याबद्दल नागरिकांत नाराजी व्यक्त होत होती.त्यामुळे झालेल्या या कारवाईचे स्थानिक नागरिकांनी स्वागत केले आहे.पोलिसांनी पुढेही अशा बेकायदेशीर वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, धाराशिव, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त...



### रामभाऊ पवार यांना राज्यस्तरीय महात्मा फुले पुरस्कार

**परंडा, दि.२७ नोव्हेंबर -**

परंडा तालुक्यातील भुमिपुत्र छत्रपती संभाजी महाराज प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष शिवश्री रामभाऊ पवार यांना अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद २०२५ यांच्या वतीने राज्यस्तरीय महात्मा फुले पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण समारंभ पुणे येथे सकाळी ११ वाजता पार पडला. उद्घाटन सत्राचे अध्यक्ष होते सुप्रसिद्ध साहित्यिक कवि किशोर टिळेकर, तर राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी या वर्षीच्या महात्मा फुले राज्यस्तरीय पुरस्कारासाठी श्री रामभाऊ पवार यांची निवड केली असल्याची माहिती दिली. शिवश्री रामभाऊ पवार यांना सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना त्यांनी सहकुटुंब उपस्थितीत आनंद व्यक्त केला. धाराशिव जिल्ह्यात या राज्यस्तरीय पुरस्कारामुळे शिवश्री रामभाऊ पवार यांचे कौतुक मोठ्या प्रमाणावर होत आहे.



### खामसवाडी प्राथमिक शाळेत संविधान दिन साजरा

**खामसवाडी, दि.२७ नोव्हेंबर -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिवपूर येथे आज संविधान दिनाचे औपचारिक कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी व व्याख्याते म्हणून रामचंद्र पवार सर, मुख्याध्यापक, माध्यमिक शाळा उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले प्रकाश नरसिंगे (मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिवपूर), सहशिक्षक आनंत बाबर सर आणि श्रीमती अंकिता चव्हाण यांनी भूमिका बजावल्या. कार्यक्रमात पालक रमेश उगले आणि अमोल सोनटक्के उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थिनी स्वरा विधाते, श्रावणी मिसाळ, अनुष्का सोनटक्के, वैष्णवी उगले यांनी संविधान दिनाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले, तर शिक्षक व उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले.




### एकलव्य विद्या संकुलमध्ये संविधान दिनाचे आयोजन

**तुळजापूर, दि.२७ नोव्हेंबर -**

तालुक्यातील एकलव्य विद्या संकुल, मंगरूळ यमगरवाडी येथे आज संविधान दिनाचे औपचारिक कार्यक्रम पार पडले. या दिवशी शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन तसेच पालक मेळावा आयोजित करण्यात आला. प्रारंभी घटना तज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित पालक इंगळे आणि अविनाश शिंदे यांच्या हस्ते फीत कापून, गोविंद सोमानी यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन उद्घाटित करण्यात आले. शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी उपस्थित पालकांना शैक्षणिक साहित्याबद्दल सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमात बहुसंख्य पालक, विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन अनिल घुगे, दयानंद भडंगे, प्रणिता शेटकार, कन्हैया व्हनाले, फुलाजी ताटी कुंडलवार, माधव पाटील, राजेंद्र पाटील यांनी केले. तसेच विठ्ठल म्हेत्रे, संतोष बनसोडे, गोविंद सोमानी, कोंडिबा देवकर उपस्थित होते.



### बोरामणी येथे श्री भावार्थ रामायण ग्रंथ वाचन निरुपण सेवा सुरू

**इटकळ, दि.२७ नोव्हेंबर -**

बोरामणी येथे श्री संत एकनाथ महाराज कृत श्री भावार्थ रामायण ग्रंथ वाचन निरूपण सेवा मोठ्या उत्साहात व आनंदात पार पडत आहे. या कार्यक्रमात दररोज सुमारे २०० रामभक्त उपस्थित राहतात. आत्तापर्यंत बालकांड, अयोध्याकांड आणि अरण्यकांड या तीन कांडांची सांगता पूर्ण झाली असून, किष्किंधा कांडाचा प्रारंभ सोमवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी करण्यात आला. त्या दिवशी सकाळी गावात ग्रंथ दिंडी सोहळा उत्साहात पार पडला आणि सायंकाळी सात वाजता हनुमान मंदिरावर किष्किंधा कांड सुरू करण्यात आला. रात्री ९ ते ११ वाजेपर्यंत हभप. शिवाजी महाराज चव्हाण यांच्या कीर्तनाचे कार्यक्रम पार पडले. रामकथेचे कार्यक्रम सयोजित आणि नियमित पार पाडण्यासाठी रामभक्त हभप. शिवाजी सुरवसे, नरेश येलम, श्रीमती शकुंतला आवटे, दत्ता हंगरगे, सुरेश विभुते, दत्तात्रय शेळके, पंडित पटणे, संजय विभुते आणि इतर ग्रामस्थ प्रयत्नशील आहेत.

### वाहतूक नियमभंगावर कारवाई

**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**

शहरातील वाहतूक शाखा आणि संबंधित पोलीस ठाण्यांनी दि.२६ नोव्हेंबर रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायदा व नियमभंग प्रकरणी कारवाई केली. या दिवशी एकूण २८३ कारवाया केल्या असून, २ लाख ३३ हजार ४५० रूपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा नगराध्यक्ष आणि नगरसेवक मोठ्या संख्येने निवडून येतील : शशिकांत शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**

धाराशिवमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषद निवडणुकीतील तुतारी चिन्हावरील ३० उमेदवार व दोन पुरस्कृत उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित भव्य जाहीर सभा उत्साहात आणि विजयी निर्धारात पार पडली. सभेला प्रचंड जनसमुदायाने उपस्थित राहून अभूतपूर्व प्रतिसाद दिला.

आपल्या प्रभावी भाषणात शशिकांत शिंदे म्हणाले, महाविकास आघाडीसोबत लढण्याची आमची इच्छा होती; भाजपाला फायदा होऊ नये म्हणून आम्ही प्रयत्न केले. मात्र आम्हाला कमी लेखले गेल्याने तुतारी चिन्हावर स्वतंत्र लढत देणे भाग पडले आहे. ते पुढे म्हणाले, आजचा हा जनसागर या गोष्टीची साक्ष देतोय की परवीन खलिफा कुरेशी आजच विजयी झालेल्या आहेत. लोकांसाठी रात्रंदिवस काम करणारा माणूस जाती-धर्म पाहत नाही. सर्व समाजबांधवांनी चांगल्या उमेदवारांना साथ द्यावी. भारतीय जनता पार्टीवरही मतचोरीचा आरोप करत त्यांचाही खरपूस समाचार घेतला. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचेही नाव न घेता यावेळी टीका केली. पुढे बोलताना शिंदे म्हणाले की, मुस्लिम समाजाला दिलेल्या प्रतिनिधित्वाचे आणि पक्षाने दाखवलेल्या खऱ्या पुरोगामी विचारांचे विशेष कौतुक केले. तुतारी चिन्हावरील उमेदवार विजयी झाल्यास जाहीरनाम्यातील प्रत्येक आश्वासन पाच वर्षांत पूर्ण करण्याची शपथ त्यांनी घेतली.



यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ नेते जीवनराव गोरे, जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, धाराशिव जिल्हा निरीक्षक भारत जाधव,प्रदेश चिटणीस मसूद शेख, माजी नगराध्यक्ष खलिफा कुरेशी, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार परवीन खलिफा कुरेशी, महिला जिल्हाध्यक्ष मनीषा राखुंडे पाटील, युवक जिल्हाध्यक्ष शेखर घोडके, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.अविनाश तांबारे तसेच पक्षाचे ३२ उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, विलास रेणके, मनीषा पाटील, शहराध्यक्ष रणवीर इंगळे, उमेदवार अर्चना अंबुरे, तेजस भालेराव, शिवशाहीर अनिल माने, उमेदवार हिना शेख यांसह इतर मान्यवरांनीही आपली मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयाज शेख यांनी केले तर प्रभावी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. तुषार वाघमारे यांनी केले.

## उमरगा : पवनचक्की प्रकल्पातून १५.७८ लाखांचे केबल साहित्य चोरी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ नोव्हेंबर -**

उमरगा पोलिस ठाणे हद्दीत जे.एस. डब्ल्यू कंपनीच्या पवनचक्की जिव निर्मिती प्रकल्पाच्या स्टोअरमधून सुमारे १५ लाख ७८ हजार २५५ रूपये किमतीचा केबल आणि कॉपर वायरचा मोठ्या प्रमाणावर माल अज्ञात चोरट्यांनी लांबविल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे.

१४ जून २०२५ ते २१ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नारंगवाडी शिवार येथील प्रकल्पाच्या नेसल युनिटमधून खालीलप्रमाणे केबल्सची चोरी झाल्याचे फिर्यादींनी नमूद केले आहे.

स्टाटर पॉवर केबल २३.५ मीटर, रोटर पॉवर केबल २४.५ मीटर, नेसल आर्थिंग केबल २२ मीटर, ४०० व्होल्ट सप्लाय केबल १६ मीटर, वायएडब्ल्यू प्लेटफॉर्म इमर्जन्सी केबल ४६ मीटर, टॉवर लाईट केबल ३५ मीटर, सेफ्टी चेन केबल १६० मीटर, जनरेटर एनकोडर केबल १६० मीटर वरील साहित्याची एकूण किंमत १५ लाख ७८ हजार २५५ रूपये इतकी आहे.

या प्रकरणी शिवाजी प्रभाकर गायकवाड (वय ४२, रा. नळदुर्ग, ता. तुळजापूर) यांनी तक्रार दिल्यानंतर उमरगा पोलिसांनी भा.दं.वि. कलम ३८०(२) अन्वये गुन्हा दाखल केला असून अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू आहे.

## जिल्हास्तरीय युवा महोत्सवात सात विद्यार्थ्यांची चमक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**

यंदाच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात धाराशिव येथील सात विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी करीत विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके पटकावली. चित्रकला स्पर्धेत जगदीश सुतार द्वितीय क्रमांक, गौरी सुतार तृतीय क्रमांक. वक्तृत्व स्पर्धेत समीर शेख तृतीय क्रमांक. विज्ञान प्रदर्शनात (समूह) मस्के दीक्षा, सावतार तनुजा, शिंदे स्नेहा, पोतदार मेघराज तृतीय क्रमांक पटकावला.




जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नेहरू युवा केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी नाट्यगृह, धाराशिव येथे हा युवा महोत्सव उत्साहात पार पडला. महोत्सवात विज्ञान-तंत्रज्ञानावरील नवसंकल्पना, सांस्कृतिक कार्यक्रम, चित्रकला, कथालेखन, वक्तृत्व, कविता, फोटोग्राफी आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. नांदेड येथे होणाऱ्या विभागीय युवा महोत्सवासाठी तेरणा महाविद्यालयाच्या जगदीश सुतार याची चित्रकला स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे डॉ. सुशीलकुमार होळंबे, सहसमन्वयक प्रा. रवींद्र गुरव, प्रा.डी.बी. ठाकूर, प्रा.डी.बी. भक्ते, प्रा. बालाजी चव्हाण, प्रा.ए.के. पिंपळे, प्रा.व्ही.एस. बोंदर, डॉ.आर.बी. ननवरे यांनी प्रयत्न केले.

विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष पद्मसिंह पाटील, आ. राणाजगजीतसिंह पाटील, प्रा. गणेश भातलवंडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## मलकापूर श्री क्षेत्र दत्त मंदिरात दत्त जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२७ नोव्हेंबर -**

कळंब तालुक्यातील श्री क्षेत्र दत्त मंदिर संस्थान येथे दत्त जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व सुभाष बाप्पा ग्रंथ पारायण सोहळा शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर पासून आयोजित करण्यात आला आहे.



सप्ताहाची सुरुवात आबासाहेब लोमटे, रुक्मीनी घोळवे, राजेश लोमटे यांच्या हस्ते कलश पूजन करून होणार आहे. त्याचबरोबर, विना पूजन तात्याराव काकडे, गोविंद वणवे, दत्ता पाटील, नरसिंग लोमटे यांच्या हस्ते, तर टाळ-मृदंग पूजन नेताजी लोमटे, पाशाभाई सय्यद, अच्युत लोमटे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

यावर्षी हा सप्ताह ४३ वा असून, वैकुंठवासी ह.भ.प. सुभाष बाप्पा लोमटे महाराज यांनी याची सुरुवात केली होती, आणि ह.भ.प. एकनाथ लोमटे महाराज यांनी ही परंपरा चालू ठेवली आहे.

सप्ताहात सात दिवस काकडा भजन, ग्रंथ पारायण, किर्तन, गाथा भजन, प्रवचन, हरी जागर व प्रहाप्रसाद यांचे कार्यक्रम आयोजित केले आहेत. दररोज रात्री ९ ते ११ वाजेपर्यंत किर्तन सेवा राहणार आहे. दि.२८ रोजी हभप. किरण ताकमोगे महाराज दि.२९ रोजी हभप. माधव महाराज बोधले, दि.३० रोजी हभप. उत्रेश्वर महाराज लोखंडे, दि.१ रोजी हभप. पापा महाराज बोबडे, दि.२ रोजी हभप. वैजिनाथ उस्तुरे महाराज दि.३ रोजी हभप. विलास मुळे महाराज दि.४ रोजी हभप. नाना महाराज कदम यांचे किर्तन होणार आहे. दत्त जयंतीच्या दिवशी पालखी सोहळा, महापूजा आणि महाप्रसादाचा दिवसभर कार्यक्रम पार पडेल. यासाठी मंदिरात विशेष मंडप उभारण्यात आले आहे.

कळंब व धाराशिव तालुक्यातील अनेक गावातील भजनी मंडळ या कार्यक्रमात सहभागी होतील. हभप. एकनाथ लोमटे महाराज यांनी सर्व भाविकांना सप्ताहाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## मलकापूर जि.प. शाळेत संविधान दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२७ नोव्हेंबर -**

कळंब तालुक्यातील मलकापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संविधान दिन उत्साहात व देशभक्तीच्या उर्मीने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर मुख्याध्यापक भंडारे बळीराम व शिक्षीका गाडे नंदिनी यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व, त्यातील मूलभूत अधिकार व कर्तव्ये यांची माहिती दिली. सर्व विद्यार्थ्यांकडून



संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन घेण्यात आले.

संविधान दिनानिमीत्त विविध सांस्कृतिक उपक्रम, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या त्यास सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. या प्रसंगी पालक व ग्रामस्थांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करण्यात आला.

## लोटस पोदार लर्न स्कूल, नळदुर्ग येथे 'संविधान अमृत महोत्सव' साजरा




**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ नोव्हेंबर -**

शासनाच्या जी.आर.नुसार सुरु असलेल्या संविधान अमृत महोत्सवा निमित्त नळदुर्ग येथील लोटस पोदार लर्न स्कूल येथे विविध उपक्रम आणि कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रतिमापूजनाचे कार्य शाळेच्या प्राचार्या रेवती शिंदे मगर यांनी केले, तर प्रशासकीय अधिकारी योगेश सुर्यवंशी यांनी पुष्पहार अर्पण करून भारतीय संविधानास व डॉ. आंबेडकरांना अभिवादन केले.

प्रार्थना सत्रादरम्यान संविधानातील प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

उद्देशिकेचे स्पष्ट, सुबक वाचन सहावीतील विद्यार्थिनी समीक्षा सनी बनसोडे हिने केले. तर पाचवीतील विद्यार्थी प्रणव दीपक रगबले हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेशभूषेत उपस्थित राहून आत्मचरित्रपर मनोगत सादर करीत कार्यक्रमाला विशेष आकर्षण दिले.

कार्यक्रमाची संकल्पना आणि अंमलबजावणी यशस्वी करण्यासाठी सीनियर कोऑर्डिनेटर देव मंगरुळे, इव्हेंट कोऑर्डिनेटर महेश कोरे, क्रीडा शिक्षक राजरत्न बनसोडे यांसह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

## दहिफळ येथे चंपा षष्टीनिमित्त खंडोबा यात्रेत भव्य सोंग-मिरवणूक



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२७ नोव्हेंबर -**

कळंब तालुक्यातील दहिफळ गावात गुरुवारी (ता. २७) चंपा षष्टी निमित्त ग्रामदैवत खंडोबा यात्रेच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक उत्साह, रंगत आणि सांस्कृतिक वैविध्याने भरलेली सोंग-मिरवणूक भव्यदिव्य वातावरणात पार पडली.

सकाळपासूनच गावातील मुख्य रस्ते आणि चौकांत गर्दी उसळली होती. बालकलाकारांनी रामायण, महाभारत, शिव-पार्वती, संत-महाराज, वाघोबा-भैरवनाथ यांसारख्या पारंपरिक सोंगांचे वेश परिधान करून उपस्थितांचे मन वेधून घेतले. तर युवक कलाकारांनी रांगडे, गोंधळी, वाघ्या-मुर्ख्या, बुरुड, गवळी, वेशीकर, ऋषीमुनी, रावण तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांसारख्या ऐतिहासिक वेशभूषा करून सोंगाचे प्रभावी सादरीकरण केले. पांढऱ्या अंगावर भस्म लावून तालावर नाचणाऱ्या कलाकारांनी यात्रेला विशेष गारुड निर्माण केले.

गावातील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि बालक घरांच्या गच्च्यांवरून आणि रस्त्यालगत उभे राहून मिरवणुकीचे स्वागत करत होते. पारंपरिक ढोल-ताशा, हलगी-नगारे आणि लेझीम पथक यांच्या गजरामुळे संपूर्ण वातावरण दणाणून गेले. विविध धार्मिक आणि सांस्कृतिक प्रसंगांचे दृश्यरूप सादरीकरण केल्यामुळे सोंग कार्यक्रम पाहणाऱ्यांचे मनमोहक ठरले.

स्थानिक युवकांनी या सोंग-मिरवणुकीची तयारी गेल्या अनेक दिवसांपासून केली होती. सामाजिक एकोपा, सांस्कृतिक परंपरा आणि ग्रामदैवतावरील भक्तीभाव जपणारा हा सोहळा यंदाही विशेष उत्साहात पार पडला, असे ग्रामस्थांनी सांगितले.

मिरवणुकीचा समारोप खंडोबा मंदिर परिसरात झाला. पूजा-अर्चा, महाप्रसाद आणि भक्तांच्या गर्दीत उत्सवाला सुंदर पूर्णविराम मिळाला. उपस्थित भाविकांनी आणि ग्रामस्थांनी दहिफळ गावची समृद्ध पारंपरिक सोंगसंस्कृती पुन्हा एकदा उजळून निघाल्याचे समाधान व्यक्त केले.

## तुळजापूर : गोमांस वाहतूक प्रकरणात एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ नोव्हेंबर -**

तुळजापूर पोलिसांनी लातूर-सोलापूर बायपास उड्डाणपूल परिसरात संशयित वाहन तपासणीदरम्यान एक व्यक्ती गोवंशीय जनावरांचे गोमांस वाहतूक करताना आढळून आला.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मोहसिन युनुसअली शेख (वय ४५ वर्षे, रा. शनिवार पेठ, सोलापूर) हा टो रिक्षा क्रमांक एमएच-१३-जी-९०७२ मध्ये अंदाजे १०० किलो गोमांस, किंमत सुमारे ३५ हजार रूपये विक्रीच्या उद्देशाने वाहतूक करत असल्याचे पोलिसांना निदर्शनास आले.

या प्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमातील कलम ५(सी), ९(अ) अन्वये तुळजापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## जयप्रकाश विद्यालयाचे क्रीडांगणात यश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात दमदार कामगिरी करत डॉजबॉल स्पर्धेत विभागीय स्तरावर प्रवेश मिळवला आहे. दि.२७ नोव्हेंबर रोजी या यशस्वी खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने उमरगा येथे दि.२५ नोव्हेंबर रोजी झालेल्या जिल्हास्तरीय शालेय डॉजबॉल स्पर्धेत विद्यालयाच्या संघांनी चमकदार कामगिरी केली. १७ वर्ष व १९ वर्ष मुलींच्या दोन्ही संघांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला असून दोन्ही संघांची विभागीय स्तरासाठी निवड झाली आहे.

क्त मुलांच्या १७ व १९ वर्ष वयोगटातील संघांनीही द्वितीय क्रमांक मिळवून आपली ताकद सिद्ध केली.

विद्यार्थ्यांना विद्यालयाचे प्राचार्य जयप्रकाश कोळगे, क्रीडा शिक्षक प्रशांत कोळगे व अश्विन कुमार पवार यांनी विशेष मार्गदर्शन केले.

सत्कार सोहळ्याला डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे, रामदास कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन कांबळे यांनी केले, तर अभिजित घोळवे यांनी आभार मानले.

# शिंदसेना ३४, महाविकास आघाडी २४ जागांवर रिंगणात

## भाजप २२ जागांवर, अपक्ष १२ जागांवर निवडणुक रिंगणात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ नोव्हेंबर**




हिंगोली नगर पालिकेच्या ३४ जागांसाठी होत असलेल्या निवडणुकीत शिवसेना शिंदेगट सव ३४ जागांवर आणि महाविकास आघाडीने सर्व २४ जागांवर त्यांचे उमेदवार निवडणुक रिंगणात उतरवले आहेत. तर भाजप २२ जागांवर निवडणुक लढवित आहे. यावेळी १२ जागांवर अपक्ष उमेदवार त्यांचे नशीब अजमावत आहेत. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या पक्षांना सर्व जागांवर उमेदवार का नाही मिळाले याविषयी आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे.

हिंगोली नगर पालिका निवडणुकीत आता चांगलीच रंगत आली असून १७ प्रभागांसाठी निवडणुक रिंगणात कोण उभे आहे याचे चित्र आता जनतेसमोर स्पष्ट झाले आहे. निवडणुकीचा धुरळा आता जोरात उडत असून दिवसरात्र सर्वच राजकीय पक्षांचे नेते आणि पदाधिकारी, उमेदवार आणि कार्यकर्ते त्यांच्या प्रभागात कॉर्नर बैठका, भेटीगाठी घेत असतांना दिसत आहेत. प्रत्येक पक्ष विकासाचे आश्वासन देतांना दिसत आहेत. आपल्या समर्थकांसह प्रभागात घरोघरी जात हात जोडत असतांना दिसत आहेत. शिवसेना शिंदेगट, भाजप आणि महाविकास आघाडी यांच्यात तिरंगी लढत होणार असल्याचे चित्र सध्या शहरात दिसत आहे.

१७ प्रभागात शिवसेना शिंदेगटाने सर्व ३४ जागांवर उमेदवार देऊन नगर पालिका निवडणुकीत इतर सर्वच पक्षांसमोर आव्हान निर्माण केले आहे. तर महाविकास आघाडीनीही एकत्र येत उबाठा शिवसेनाचे १०,कॉंग्रेस १० तर राष्ट्रवादी शरदचंद्र पवारगट ४ जागांवर निवडणुक रिंगणात उतरला आहे.

यावेळी महायुतीतील शिवसेना शिंदेगट, भाजप आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट स्वतंत्रपणे निवडणुक रिंगणात उभे ठाकले आहेत. भाजपने २२ जागांवर उमेदवार उभे केले आहेत तर राष्ट्रवादीने अजित पवार गट २८ जागांवर निवडणुक लढवित आहे. या निवडणुकीत महायुती न झाल्याने सत्ताधारी पक्षात आरोप-प्रत्यारोप होत असून शिवसेना शिंदे गटाचे आ. संतोष बांगर आणि भापजचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्यात खालच्या पातळीवर टीका होत असतांना दिसत आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या काळत्तत भाजपच्या तीन उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली. या उमेदवारांची फोडाफोडी झाली. त्याचा फटका भाजपला बसला. त्यामुळे हे उमेदवार का फुटले, त्यांची नाराजी काय आहे याविषयी भाजपला आत्मचिंतन करावे लागेल. सध्या राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट शांत आहे. माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष शेख हाजी निहाल ईस्माईल यांचेसारखे दिग्गज नेते भाजपकडून आहेत की शिवसेना शिंदेगटाकडून आहेत याबाबत आणखी पत्ते ओपन झाले नसल्याचे दिसत आहे. दुसरीकडे महाविकास आघाडी एकत्रित लढत असली तरी प्रचारात मात्र उबाठा शिवसेनेचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे, प्रदेश संघटक वसीम देशमुख उपजिल्हाप्रमुख परमेशव्र मांडगे, जिल्हा प्रमुख गोपू पाटील, संदेश देशमुख यांच्या सभा होत असतांना दिसत आहेत. महाविकास आघाडीने शिंदसेना आणि भाजपसमोर कडवे आव्हान उभे केले असून याठिकाणी तिरंगी लढत होणार असल्याचे दिसत आहे. या निवडणुकीत एमआयएम २ जागांवर, समाजवादी पक्ष १, वंचीत बहुजन आघाडी ४ जागांवर निवडणुक लढवित आहे. तर ११ ठिकाणी अपक्ष उमेदवार निवडणुक रिंगणात आहेत.

# आ. बांगर यांच्या घरावरील झाडाझडतीचा दावा पोलिसांनी फेटाळला

## आ. हेमंत पाटील, आ. बांगर तोंडघशी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ नोव्हेंबर**

माझ्या घरावर भल्या पहाटे सहा वाजता १०० पोलिसांनी छापा टाकून झाडाझडती धेतली असा आरोप करीत मतदारांकडून सहानुभूती मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न हिंगोली पोलिसांच्या दाव्यामुळे फसला असून आ. संतोष बांगर यांच्या घराची झाडाझडती घेतलीच नाही असा दावा पोलिस करीत आहे. दुसरीकडे तत्काळ याप्रकरणावर पत्रकार परिषद घेत आ. मुटकुळेंवर अधिवेशनात हक्कभंग आणणार असे म्हणणारे माजी खा तथा आ. हेमंत पाटील हे देखील तोंडघशी पडले आहेत.

हिंगोली नगर पालिकेत महायुतीतील शिवसेनेचे आ. संतोष बांगर आणि भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्यात चांगलाच संघर्ष पेटला असून विकास मुद्द्यावरून आता दोन्हीही आमदार एकमेकांचे वाभाडे काढीत खालच्या पातळीवर टीका करीत असतांना दिसत आहेत. आ. संतोष बांगर यांनी शहरातील प्रचारा दरम्यान एका कॉर्नर सभेत उपस्थित महिला व मतदारांना आकर्षित करण्यासाठी भावनिक मुद्दा पुढे करीत भाजपचे स्थानिक आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी माझ्या घरी १०० पोलिसांना पाठवून पहाटे सहा वाजता माझ्या घराची झाडाझडती घेतली. एका आमदारावर अशी कारवाई होते तर सर्वसामान्यांचे काय असे म्हणत या कारवाईचा वचपा माझ्या लाडक्या बहिणी निश्चित घेतील अशी भावनिक साद घातली.

यानंतर माजी खा हेमंत पाटील यांनी दि २७ रोजी पत्रकार परिषद घेत आ. मुटकुळे यांचे नाव न घेता आम्हाला माहीत आहे ही कारवाई कोणी करावयास लावली असे म्हणत आ. बांगर हे संविधानिक पदावर असतांना विधानसभा अध्यक्षांच्या परवानगीशिवाय त्यांच्या घराची झाडाझडती पोलिसांनी कशी घेतली असा सवाल करीत पोलिस दादागिरी करीत असल्याचा आरोप केला. तसेच याबाबत मुख्यमंत्र्याकडे तक्रार करणार असून येत्या हिवाळी अधिवेशनात हक्कभंग आणणार असल्याचेही लगेलग सांगितले.

याबाबत पोलिस प्रशासनाला विचारले असता त्यांनी आम्ही रेकॉर्डवरचे गुन्हेगार तपासत होतो. आ. बांगर यांचे घर आम्ही तपासलेच नाही. रेकॉर्डवर असलेल्या सात गुन्हेगारांच्या तपासणीचे सर्च वॉरंट आमच्याकडे होते. त्यात कुठेही आमदार संतोष बागंर यांचे नाव नव्हते. आमदार बांगर यांच्या घरी पोलिस जाण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे पोलिस प्रशासनाने सांगितले.

शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप मोदे यांनीही आ. बांगर यांच्या घराच्या झाडाझडतीचा दावा फेटाळला असून आमच्या पोलिस ठाण्यात केवळ ६७ पोलिस कर्मचारी कार्यरत आहे असे सांगितले.

नगर पालिका निवडणुका जिंकण्यासाठी आ. संतोष बांगर आणि आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्यात आरोप-प्रत्यारोप होत असून हा संघर्ष आता वैयक्तिक टीकेपर्यंत येऊन पोहोचला आहे परंतु या सर्व राजकीय आरोप प्रत्यारोपात निवडणुक प्रक्रियेत काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर बिनबुडाचे आरोप करणे महागात पडणार असून प्रचाराची पातळी धसरली असल्याचे पहायला मिळत आहे.

# हिंगोलीत पतंजलीचे वृक्षमित्र, हरित शाळा पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ नोव्हेंबर**



पतंजलीच्यावतीने पाच संस्थांसह वीस वृक्षमित्र तर दहा शाळा हरित शाळांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. येथील संत निरंकारी भवन येथे या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतंजली योग समितीचे प्रांताध्यक्ष दिनेश राठोड, तर मुख्य अतिथी म्हणून प्रांत सदस्य कुंडलिकराव निर्मले, माजी जिल्हा न्यायाधीश अ‍ॅड.पद्माकर पुरी, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे, खाजगी अनुदानित पतसंस्थेचे अध्यक्ष प्राचार्य विठ्ठल मुटकुळे, पतंजली योग समिती भारत स्वाभिमान ट्रस्टचे जिल्हा प्रभारी विठ्ठल सोळंके आदींची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्याहस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार टिळे तर आभार प्रदर्शन रमेश काळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी किसान सेवा प्रभारी ज्ञानदेव गुट्टे, पतंजली महामंत्री शितल तापडिया, पतंजली व भारत स्वाभिमान सहप्रभारी अशोक पवार, बालासाहेब हरण, कोषाध्यक्ष उमेश तोष्णीवाल, जगन सरकटे, बाबाराव पवार, सतीश तायडे, रामकिसन मोरे, गजानन सावके, संजय नाईक, तानाजी दासूद, कडूजी हजारे, मंगल काळे, रजनी कदम आदींनी परिश्रम घेतले.



**हिंगोली- नगर पालिका निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणुक विभागाच्यावतीने येथील कल्याण मंडपम् सभागृहात राजकीय पक्षाचे उमेदवार तसेच प्रतिनिधी यांना मतदान यंत्र, मतदान प्रक्रिया तसेच निवडणुकीसंदर्भात माहीती देतांना अधिकारी व कर्मचारी दिसत आहेत. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### महात्मा फुले यांचे विचार प्रासंगिक- अग्रवाल

हिंगोली- मुली अन् स्त्रीयांना शिक्षणाचे द्वार प्रवेशनारे, काबाडकष्ट, शेतकरी सामान्यांच्या प्रश्नांची निर्भीडतेनं मांडणी करणारे ऐतिहासिक महाराष्ट्रातील नामवंत सामाजिक विचारवंत महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार प्रासंगिक असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांनी दि. २८ शुक्रवारी केले आहे. राष्ट्रपिता ज्योतिराव फुले यांच्या १३५ व्या स्मृतिप्रीत्यर्थ, नशामुक्त भारत अभियान समिती, महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने येथील सुप्रसिद्ध गंगाप्रसादजी अग्रवाल सर्वोदय कार्यालयात अभिवादन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल, साहित्यिक प्रकाश अंभोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. महात्मा फुले यांच्या विचारांची समाजाला आज मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. सामाजिक विचारवंत फुले यांनी व्यसनमुक्ती प्रबोधनासाठी आपल्या जीवाचे रान केले. व्यसनांच्या तत्कालीन वितरण यंत्रणेचा खरपूस समाचार घेत, आंग्ल अधिकार्यांना धारेवर घेऊन व्यसनी धोरनाचा तीव्र विरोध केल्याचे विशाल अग्रवाल यांनी सांगितले. प्रारंभी राष्ट्रपिता ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेस खादीचा सुत्रहार अर्पण करण्यात आला. जिल्हा अध्यक्षा एस. बी. सरोदे यांच्या हस्ते तंबाखूमुक्तीची प्रतिज्ञा देण्यात आली. व्यसनमुक्ती दूत मृण्मयी अग्रवाल यांनी व्यसनांच्या दुष्परिणामांबाबत पत्रकांचे वितरण केले. राम जाधव, सुभाष कुंभारकर, गंगाधर उबारे, बालाजी दुकाने आदींनी परिश्रम घेतले.

### आरक्षण क्रांती पदयात्रेचे स्वागत



हिंगोली- अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणासाठी लहुजी शक्ती सेना महाराष्ट्रवतीने मुंबई ते नागपूर आरक्षण क्रांती पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेचे स्वागत कळमनुरी तालुक्यातील शिवनी बाभळी येथे मातंग समाजाच्यावतीने करण्यात आले. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू कसबे, शिवाजी महाराज गजभारे, जिल्हाध्यक्ष संदेश शिखरे, जिल्हा कार्याध्यक्ष पंडित भालेराव, शहराध्यक्ष संतोष घोंगडे, महिला जिल्हाध्यक्षा सौ कुसुम हनवते, महिला जिल्हा सचिव सौ शुभांगी भालेराव, हिंगोली तालुकाध्यक्षा सौ पूजा मानमोठे, तालुकाध्यक्ष केशव लांडगे, तालुका अध्यक्ष अनिल डोके, तालुका उपाध्यक्ष विशाल गायकवाड, महिला तालुकाध्यक्षा सौ सपना भालेराव, पदयात्रेतील सेवेकरी व मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

### तीन वाहनांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तीन वाहनांवर पोलिसांनी कारवाई केली.

# वसमतमध्ये महाविकास आघाडीचे रॅलीद्वारे शक्तीप्रदर्शन




**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २८ नोव्हेंबर**

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या प्रचारार्थ शहरात भव्य रॅली काढून शक्तीप्रदर्शन करण्यात आले. यावेळी महाविकास आघाडीतील नेतेमंडळी उपस्थित होते.

या रॅलीस खासदार मा. नागेश आष्टीकर आणि माजी मंत्री मा.जयप्रकाश दांडेगावकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.सकल वसमतकरांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला. संपूर्ण शहर घोषणाबाजीने दणाणून गेले. शहरातील प्रमुख मार्गावरून रॅली काढण्यात आली. कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट तसेच उबाठा शिवसेनाचे पदाधिकारी होते.वसमतच्या विकासासाठी महाविकास आघाडीच अशी घोषणबाजी रॅलीतील मंडळीनी दिली. यावेळी माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, खा नागेश पाटील आष्टीकर यांनी वसमतच्या सर्वांगीण व गतिमान विकासासाठी महाविकास आघाडीच सक्षम आहे असा ठाम विश्वास व्यक्त केला. महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना मतरूपी आशीर्वाद देऊन बहुमतांनी विजयी करा, असे आवाहन मतदारांना केले.

युवा, महिला, ज्येष्ठ नागरिक, व्यावसायिक यांचा मोठा सहभाग लक्षवेधी ठरला. या रॅलीने वसमत निवडणुकीत चांगलीच चुरस निर्माण झाली असून नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सीमा अब्दुल हाफीज यांच्यासह महाविकास आघाडीचे उमेदवारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# श्री संत सेवालाल महाराज यांच्या ध्वजाची विटंबना करणाऱ्यावर कारवाई करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ नोव्हेंबर**



सेनगाव तालुक्यातील लिंबाळा तांडा येथील श्री संत सेवालाल महाराज यांचा ध्वज पाडून विटंबना करणाऱ्या वाळूच्या टिप्परवर कारवाई करण्याची तसेच ब्रम्हवाडी, चिखलागार, बोडखा येथून होणाऱ्या अवैधवाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याची मागणी बंजारा समाजाच्यावतीने पोलिस निरीक्षक दिपक मस्के यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

लिंबाळा तांडा येथील श्री संत सेवालाल महाराज यांचा ध्वज एका वाळूने भरलेल्या टिप्परने पाडून विटंबना केल्यामुळे या परिसरातील बंजारा समाज आक्रमक झाला आहे. सदरील टिप्पर चालक फरार झाला असून या भागात असलेल्या पूर्णा नदीच्या पात्रातून ब्रम्हवाडी, चिखलागार, बोडखा या भागातून वाळूचा उपसा करून लिंबाळा तांडा मार्गे टिप्पर जात आहेत. सदरील टिप्पर हे भरधाव वेगाने धावत असल्यामुळे या भागातील लोकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. सदरील टिप्पर ओव्हरलोड असल्यामुळे नवीन रस्त्यावर खड्डे पडत आहेत. याचा त्रास परिसरातील नागरिकांना होत आहे. अवैध वाळू वाहतुक करणारे वाळू माफीया जनतेला धमकावत आहेत. तसेच दहशत निर्माण करीत आहेत. लिंबाळा तांडा येथे ५० ते ६० वाहने थांबत असून नागरिकांनी विरोध केल्यास त्याना वाळू माफीया जीवे मारण्याची धमकीही देत असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे. यावेळी बंजारा समाजाच्यावतीने सदरील वाळू माफीयांवर कार्यवाही करून बंदोबस्त करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# वसमतमध्ये प्रभागातील मतदारांचा माजी नगरसेवकांवर रोष

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २८ नोव्हेंबर**

नगरपरिषद निवडणुकीच्या तोंडावर वसमत शहरातील एका महत्त्वाच्या प्रभागात मतदारांमध्ये मोठी नाराजीची लाट उसळलेली दिसत आहे. सलग चार ते पाच कार्यकाळांपासून सत्ता उपभोगलेल्या माजी नगरसेवकाच्या कार्यपद्धती, विकासातील विलंब, जनसंपर्काचा अभाव आणि निवडणुकीच्या काळातच दर्शन या मुद्यांवर नागरिकांनी थेट नाराजी व्यक्त केली आहे.

स्थानिक पातळीवर घरोगरी झालेल्या चर्चांमध्ये मतदारांचे एकच धोरण स्पष्ट दिसत आहे. जुन्यांना धडा शिकवण्याची वेळ आली आहे. काम नाही तर मतदान नाही. यावेळी नव्या चेहऱ्याला संधी देऊ असे मतदारांचे सूर निघत आहे. विशेष म्हणजे त्या प्रभागात यंदा तरुण आणि तडफदार नवीन उमेदवार निवडणूक रिंगणात उतरला असून, त्याने निवडणुकीपूर्वीच नागरिकांच्या समस्या ऐकून तत्काळ तोडगा काढण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नवीन उमेदवाराच्या बाजूने जनमत वेगाने झुकत असल्याचे संकेत मिळत आहेत. स्थानिक नागरिकांच्या मतानुसार पाच वर्षांनी येणारे नाही, रोज उपलब्ध राहणारे लोक आम्हाला पाहिजेत. प्रभागासाठी काम करणारा माणूस निवडणार, पक्ष नाही तर विकास बघू. त्यामुळे या प्रभागातील मतदानाची दिशा संपूर्ण वसमतच्या राजकीय समीकरणात उलथापालथ घडवू शकते, अशी चर्चा राजकीय पटलावर रंगू लागली आहे.मतदार नाराजीचे मतदानात रूपांतर करतील का? नवीन चेहऱ्याला विश्वासाची संधी मिळणार का? की शेवटच्या क्षणी समीकरणे बदलतील? २ तारखेचे मतदानच ठरवणार, माजी नगरसेवकाला पुन्हा संधी मिळणार की बदलाची घंटा वाजणार हे निकालानंतर स्पष्ट होणार आहे. दरम्यान, वसमत शहरात महाविकास आघाडी, शिवसेना-राष्ट्रवादी अजित पवार गट तसेच भाजप आणि अपक्ष उमेदवार यांच्यात चांगलाच सामना पहायला मिळणार आहे. माजी मंत्री मुंदडा यांची भूमिकाही निर्णायक ठरणार आहे.

# कळमनुरीत राजकीय पक्ष उमेदवार, प्रतिनिधींची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**कळमनुरी, २८ नोव्हेंबर**



नगर पालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५ च्या अनुषंगाने कळमनुरी तहसील कार्यालयात तहसीलदार जीवककुमार कांबळे यांच्या उपस्थितीमध्ये दि २९ नोव्हेंबर रोजी निवडणुकीत उमेदवार तथा प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली असून या बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नगर पालिका सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणुक विभागाच्यावतीने जय्यत तयारी करण्यात आली असून दि २७ रोजी राजकीय पक्ष, उमेदवारांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींना मतदान प्रक्रियेसंदर्भात माहीती देण्यात आली. तसेच दि २९ नोव्हेंबर रोजी तहसील कार्यालयात मतदान यंत्र मतदान प्रक्रियेसाठी तयार करण्यात येणार आहेत. यावेळी उमेदवार किंवा प्रतिनिधी यांना उपस्थित राहण्याचे आवाहन तसेच सिलींगच्या ठिकाणी मोबाईल किंवा इलेक्ट्रॉनीक उपकरण आणता येणार नाही. तसेच स्ट्राँगरूम उघडतांना किंवा बंद करतांना उमेदवार किंवा प्रतिनिधीनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी तहसीलदार जीवककुमार कांबळे, मुख्याधिकारी रविराज दरक यांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हायवाच्या धडकेत चिमुकल्या नातवाचा मृत्यू आजोबा गंभीर जखमी

## संतप्त जमाव धडकला विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयावर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ नोव्हेंबर-**

समृध्दी महामार्गाच्या कामावर चालणाऱ्या हायवाच्या धडकेत तीन वर्षीय बालकाचा जागीच मृत्यू झाला तर त्याचे आजोबा गंभीर जखमी झाल्याची घटना आज दि.२८ नोव्हेंबर रोजी सकाळी आठच्या सुमारास विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयासमोर घडली. या प्रकरणी ट्रक चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



शहरातील कौठा भागातील कुशीनगर येथील नागेश राजेश भुतके यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अंबाजोगाई येथे राहणारी त्यांची बहिण शुभांगी संपत आचार्य यांचा मुलगा प्रणव (वय तीन वर्ष) हा तीन दिवसापूर्वी कुशीनगर येथे आजोबाकडे आला होता. आज दि.२८ नोव्हेंबर रोजी सकाळी प्रणव आपले आजोबा राजेश भुतके यांच्यासोबत जॉगिंगला गेला असता विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालया समोरील चौकात भरधाव आलेल्या हायवा क्र.आरजे-०४-जीडी-८७५१ ने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत प्रणव आचार्य (वय ३ वर्ष) याचा जागीच मृत्यू झाला तर राजेश माधवराव भुतके गंभीर जखमी झाले. दोघांनाही शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रणव याच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात येत आहे तर राजेश भुतके यांच्यावर उपचार सुरु आहेत. दरम्यान घटना घडल्यानंतर या घटनेस सार्वजनिक बांधकाम विभाग जबाबदार असल्याचे आरोप करत परिसरातील नागरिकांनी विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयासमोर तीव्र निदर्शने केली. चालकाला तातडीने अटक करुन त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी लावून धरली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी सुरज गुरव व पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन दिल्याने जमाव शांत झाला. या प्रकरणी नागेश भुतके यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी हायवाचा चालक तथा मालक केसाराम थानाराम रा.रायको की ढाणी सरजु पणजी बाईमेर राजस्थान याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, सहायक पोलीस निरीक्षक रोकडे, पोलीस उपनिरीक्षक संजय केंद्रे, महेश गायकवाड यांच्यासह कर्मचाऱ्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

बालकाच्या मृत्यूमुळे संतप्त झालेल्या परिसरातील नागरिकांनी काही काळ वाहतूक रोखून धरली होती. यावेळी तुरळक अशी दगडफेक देखील करण्यात आली. पोलिसांनी तातडीने परिस्थिती नियंत्रणात आणली.

दरम्यान या मार्गावर अपघात मोठ्या प्रमाणात घडत असल्याने पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी तातडीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याशी संपर्क साधून या चौकामध्ये गतिरोधक बसवावे तसेच दुभाजकाची लांबी वाढवावी, अशी मागणी करत पत्रव्यवहार देखील केला आहे.

## हडको येथे लहुजी साळवे सार्वजनिक जयंती सोहळ्याचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २८ नोव्हेंबर-**

आद्य क्रांतिगुरू लहुजी साळवे यांच्या २३१ वी सार्वजनिक जयंती सोहळ्याचे दोन दिवसीय आयोजन लहुजी साळवे सांस्कृतिक सभागृह हडको येथे दिनांक २९ व ३० नोव्हेंबर २०२५ रोजी करण्याचे आयोजिले आहे तेव्हा जयंती सोहळ्यानिमित्त शाहिरी जलसा व प्रबोधन सभेचे ही आयोजन करण्यात आले आहे.

आद्य क्रांतिगुरू लहुजी साळवे हे भारतीय क्रांतिकारक म्हणून ओळखले जातात त्यांना काही वेळा लहुजी वस्ताद असेही म्हणून ओळखले जायचे लहुजींना युद्ध करण्याची प्रशिक्षण घरातूनच मिळाले होते या महान योद्धाची हडको येथील लहुजी साळवे सभागृहात दिनांक २९ व ३० नोव्हेंबर २०२५ रोजी दोन दिवसीय कार्यक्रम सार्वजनिक जयंती मंडळाच्या वतीने आयोजिले आहे. दिनांक २९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता ध्वजारोहण गंगाधर वाघमारे यांच्या हस्ते होईल. तर सायंकाळी ४ वाजता शाहिरी जलसा शाहीर गौतम पवार भुकमारीकर आणि त्यांचा संच हे सादर करतील त्यानंतर ५ वाजता प्रबोधन सभेला सुरुवात होईल. याचवेळी या कार्यक्रमाचे उद्घाटन नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या हस्ते होईल्. त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते माधव डोम्पले तर यावेळी प्रवक्ते म्हणून डॉ .भगवानराव वाघमारे हे उपस्थितांना मार्गदर्शन करतील. यावेळी या कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती प्रकाश कांबळे हे असतील. तर दिनांक ३० नोव्हेंबर रोजी या सभेचे उद्घाटन दक्षिणचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते होईल. या सभेचे अध्यक्ष आनंदा गुंडले हे असतील तर प्रमुख वक्ते म्हणून

ड.वैशालीताई डोळस हे उपस्थितांना मार्गदर्शन करतील तर या कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती प्राध्यापक विनोद काळे हे असतील. यावेळी विशेष उपस्थिती व प्रमुख पाहुणे यांची उपस्थिती असेल तेव्हा ४

वाजता शाहिरी जलसा उद्याचा सूर्य या विषयावर कार्यक्रम होईल. तर सायंकाळी ५ वाजता प्रबोधन पर मार्गदर्शन होईल. तरी परिसरातील समाज बांधवांनी



सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहण्याचे आव्हान जयंती मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत मेकाले, उपाध्यक्ष उत्तमराव घोडसकर, कार्याध्यक्ष आनंदराव गायकवाड, सचिव पप्पू गायकवाड, स्वागत अध्यक्ष श्रीरंग खांजोडे, कोषाध्यक्ष मरीबा बसवंते, सहकोषाध्यक्ष नितीन वाघमारे, सहकार्याध्यक्ष ज्ञानेश्वर ढाकणीकर, संघटक संघपाल कांबळे, सहसचिव विठ्ठल घाटे, प्रसिद्धीप्रमुख संजय कुमार गायकवाड, संघटक पीएम सूर्यवंशी, संघटक ज्ञानोबा सूर्यवंशी, यांनी आवाहन केले आहे तर या कार्यक्रमाचे निवेदक बालाजी गवाले व निवेदिका वर्षा खानजोडे हे करतील. तेव्हा परिसरातील सर्व समाज बांधव व नागरिकांनी या जयंती सोहळ्यास उपस्थित राहून जयंती सोहळ्याची शोभा वाढवावी असे आव्हान लहुजी साळवे सार्वजनिक जयंती मंडळ हडको यांनी केले आहे.

## कंधारेवाडी मध्ये श्री खंडोबा यात्रेनिमित्त रंगतदार कुस्ती स्पर्धा

**फुलवळ-** कंधारेवाडी ता. कंधार येथील श्री खंडोबा यात्रेत यंदा प्रथमच कुस्तीचा थरार अनुभवायला मिळाला. या ऐतिहासिक कुस्तीच्या आखाड्याने नांदेड, हिंगोली, परभणी आणि लातूर जिल्ह्यांतील नामांकित मल्लांना एकत्र आणले, ज्यामुळे कुस्तीचे सामने चांगलेच रंगले. अनेक चुरशीच्या लढतीनंतर, या कुस्ती स्पर्धेतील पहिले बक्षीस नांदेड जिल्ह्यातील बामनी येथील पैलवान दिलीप किशन सांगळे यांनी पटकावले. सांगळे यांनी आपल्या दमदार खेळाने उपस्थितांची मने जिंकली. दुसरे बक्षीस कृष्णा कैलास फुलारी तर तिसरे बक्षिस दिप कागणे या पहेलवानाने जिकले. विजेत्या पैलवानाला बक्षीस वितरण गावचे ज्येष्ठ आणि प्रतिष्ठित नागरिक रामचंद्र डिगोळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच शंकर डिगोळे, माजी सरपंच केशव कंधारे, माजी उपसरपंच गुरुनाथ आमलापुरे, पोलीस निरीक्षक वाघमारे, पो.कॉ. बालाजी गारोळे, पो.पा. मोरे, तंटामुक्ती अध्यक्ष भगवान कंधारे, राजीव कंधारे, रमेश बारोळे ,माजी चेरमण माधव जिंके यांसह अनेक मान्यवर आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी या रोमांचक कुस्तीच्या डावासाठी हजेरी लावली होती. या यशस्वी आयोजनामुळे कंध२रेवाडीच्या यात्रेत एक नवीन उत्साह संचारला.



## किनवट नगर परिषद निवडणूक : भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. मांगाराणी अंबुलगेकर यांची दौरा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २८ नोव्हेंबर-**

आगामी किनवट नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाकडून प्रचाराला जोर देण्यात येत असून, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. मंगाराणी अंबुलगेकर यांनी आज किनवट शहरातील विविध प्रभागांना भेट देत भाजप उमेदवारांच्या विजयासाठी प्रभावी प्रचार मोहीम राबविली.



प्रभागांतील नागरिकांशी संवाद साधताना सौ. अंबुलगेकर यांनी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती देत भारतीय जनता पक्षाच्या विकासकार्यांनिशी जोडलेली भूमिका स्पष्ट केली. पक्षाच्या उमेदवारांना प्रचंड पाठिंबा मिळत असून नागरिक विकासाभिमुख नेतृत्वाची निवड करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रचार दौऱ्यानंतर सौ. अंबुलगेकर यांनी किनवटचे आमदार भीमराव केराम यांच्या निवासस्थानी भेट दिली. आमदार केराम यांनी सौ. अंबुलगेकर यांचे पुष्पगुच्छ देऊन मनःपूर्वक स्वागत केले. यावेळी नगरपरिषद निवडणुकीतील रणनीती, पक्षाची संघटनात्मक तयारी आणि प्रभागनिहाय राजकीय समीकरणांवर चर्चा झाली.

या भेटीत पंचायत समितीचे माजी सभापती दत्ता आडे, मंडळ अध्यक्ष उमाकांत कऱ्हाळे, युवा नेते रवी चव्हाण, रमेश बद्दीवार, माजी उपनगराध्यक्ष व्यंकट नेम्मानिवार, पद्मा गोऱ्हे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी एकत्रितपणे नगरपरिषद निवडणूक जिंकण्यासाठी संघटितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

नगरपरिषद निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतसा विविध पक्षांचा प्रचार वेग घेत असून किनवट शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

## जिल्ह्यातून काँग्रेस, भाजपाचा सुपडासाप करा : सुजात आंबेडकर

**मुदखेड-** स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी व काँग्रेसची नांदेडमध्ये युती झाली होती ती फिफ्टी-फिफ्टी अशी असताना काँग्रेसने युतीचा धर्म पाळला नाही वंचितच्या उमेदवाराविरुद्ध उमेदवार दिलेत युतीचा धर्म पाळत नाहीत त्यांच्यासोबत वंचित जात नाही त्यामुळे भाजपा आणि काँग्रेसला जिल्ह्यातून सुपडासाप करा अशी संतप्त भावना मुदखेड येथील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रुतीताई खंडेलोटे यांच्या प्रचार सभेत बोलताना सुजात आंबेडकर यांनी व्यक्त केले ते पुढे बोलताना म्हणाले की बिहारमध्ये काँग्रेसने आरजेडी सोबत असल्यामुळेतिथें बीजेपीची सत्ता आली मताची टक्केवारी पाहिली तर सर्वात एक क्रमांकाचा पक्ष राहिला काँग्रेस भाजपा एकाच नाण्याच्या दोन बाजू असून वंचित बहुजन आघाडी जनतेच्या हितासाठी लढते जिथे जिथे एसी, एसटी, ओबीसीवर अन्याय होतो तिथे वंचित बहुजन आघाडी लढत असते आमच्यासमोर मोदी असो की फडणवीस आम्ही कोणालाही भीत नाही असा संतप्त सवाल सुजात आंबेडकर यांनी केला. तसेच नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सौ . श्रुतीताई बालासाहेब खंडेलोटे . नगरसेवक पदाचे उमेदवार सौ अशालता जीवन चौदंते. राहुल बबन चौदंते. या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन सुजात आंबेडकर यांनी केले. या सभेला अविनाश भोसीकर, प्रशांत इंगोले, श्याम कांबळे, डि.जी. चौदंते, प्रशात निखाते, समता सैनिक दलाचे बाळकृष्ण चौदंते, मधुकर खंडेलोटे, यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.



## अखेर त्या शाळेला मिळाले दोन शिक्षक



**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

कायम शिक्षक आमच्या शाळेला द्या या मागणीसाठी मागे २६ नोव्हेंबर रोजी ईस्लापूर सावरकरनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतीला पालकांनी कुलूप ठोकले होते त्या अनुषंगाने सतत दोन दिवसाच्या नंतर येथील गटशिक्षणाधिकारी अनिल महामुने ' यांनी दोन शिक्षकाची मे महिन्यापर्यंत नेमणूक केल्याचे पत्र दिल्याने अखेर येथील बंद शाळेचे कुलूप खोलण्यात आले त्यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक सरपंच माजी सरपंच व पालक वर्ग उपस्थित होते .

किनवट तालुक्यातील ईस्लापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गेल्या महिन्याभरापासून डेप्युटेशन च्या नावावर अध्यापनासाठी येथील शाळेवर रोज नवीन शिक्षक येत असल्याने येथील पालकांनी विद्यार्थ्यांचे कोणतेच बेसिक शिक्षण पूर्ण न होत नसल्याने अनेक वेळा संबंधित शिक्षण विभागाकडे कायमस्वरूपी शिक्षकाची मागणी केली होती परंतु त्या मागणी ची दखल न घेतल्याने दिनांक २६ रोजी सदरील शाळेतील पालकानी शाळेला कुलूप ठोकले होते . त्या संदर्भात अखेर त्या शाळेला मे महीण्यापर्यंत राजेंद्र देवकते , व धनंजय शिंदे , असे दोन शिक्षक मिळाले.

## पीपल्स कॉलेजमध्ये संविधान दिन उत्साहात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ नोव्हेंबर-**

भारतीय संविधान गौरव दिनानिमित्त पीपल्स कॉलेज, नांदेड येथे संविधान दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. भारताच्या घटना परिषदेने अथक परिश्रमांनंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी देशाला राज्यघटना अर्पण केली होती. या ऐतिहासिक घटनेला आज ७६ वर्षे पूर्ण झाली आहेत.

कार्यक्रमाची सुरुवात प्रभारी प्राचार्य डॉ. शिवशंकर भानेगावकर यांच्या हस्ते राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून झाली. त्यानंतर भारतीय राज्यघटनेचे पूजन करण्यात आले व सर्व उपस्थितांनी सामूहिकरित्या संविधान उद्देशिकेचे वाचन केले.

कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. अशोक सिद्धेवाड, नांदेड एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारिणी सदस्य प्रा. विलास वडजे, इंग्रजी विभागातील प्रा.आनंदा थोरात, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. स्वाती काटे, प्रा. सविता महाजन, ग्रंथपाल प्रा. संदीप गायकवाड उपस्थित होते.

## गीता पाठांतर स्पर्धेचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ नोव्हेंबर-**

येथील श्री दासगणु संत भक्त मंडळ आणि सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमद् भगवदगीता पाठांतर स्पर्धा येत्या दि. १ डिसेंबर रोजी दुपारी ४ वा. कुसुम सभागृह येथे होणार आहे.

श्री दासगणु संत भक्त मंडळ आणि सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने ही पाठांतर स्पर्धा गेल्या दहा वर्षापासून चालू आहे. यंदाचे हे अकरावे वर्ष आहे. दरवर्षी गीता जयंतीच्या निमित्ताने माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यासाठी ही स्पर्धा घेतली जाते.

यावर्षी सोमवार, दि. १ डिसेंबर रोजी दुपारी ४ ते ७ दरम्यान कुसुम सभागृहात गीता पाठांतर स्पर्धा होत आहे. या स्पर्धेत नांदेडातील १२ शाळांचे किमान दीडशे विद्यार्थी भाग घेणार आहेत. या शाळांमध्ये ऑक्सफोर्ड इंटरनॅशनल स्कूल, गुजराती हायस्कूल, होली सिटी, टायनी एन्जल्स, सांदिपनी पब्लीक स्कूल, प्रतिभा निकेतन, शाकुंतल स्कूल, कमला नेहरु कन्या शाळा, केंब्रिज स्कूल, राणी लक्ष्मीबाई क. शाळा, कै. नाना पालकर, प्रज्ञा निकेतन यांचा समावेश आहे. या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध बालसाहित्यिक प्रा. डॉ. सुरेश सावंत हे उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ विजेत्यांना अनुक्रम ३०००, २०००, १०००/- रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह दिले जाणार आहे. तसेच सहभागी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना प्रमाणपत्र देऊन गौरविले जाणार आहे. या कार्यक्रमात भगवदगीता महात्म्य चित्रफित दाखवली जाते. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. शंतनु कस्तुरे, संताबादास देशमुख, सौ. नीता चौधरी हे राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, उपप्राचार्य डॉ.सौ. अरूणा शुक्ला, प्राध्यापक व श्री दासगणू संत भक्त मंडळाचे सदस्य विशेष परिश्रम घेत आहेत. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सगरोळीत अश्वमित्रांना खुरसफाईचे प्रशिक्षण व किटचे वितरण

**बिलोली-**गाढवांच्या खुरांची योग्य निगा व व्यवस्थापन हे त्याच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण खुर हे संपूर्ण शरीराचे वजन पेलणारे मजबूत आधारस्तंभ असतात. खुरांची वेळोवेळी सफाई न झाल्यास किंवा नियमित छाटणी न केल्यास गाढवांना चालण्यात वेदना, असंतुलन तसेच गंभीर पायाच्या समस्या उद्भवू शकतात. या पार्श्वभूमीवर सगरोळी (ता. बिलोली) येथील 'धर्मा डाँकी सेंचुअरी' संस्थेतर्फे गाढवांच्या खुरांची व्यवस्थित काळजी घेण्यासाठी परीसातील १० अश्वमित्रांची निवड करून विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. गत आठवड्यात घेण्यात आलेल्या प्रशिक्षणात खुर व्यवस्थापनाचे सविस्तर मार्गदर्शन तसेच प्रत्येक अश्वमित्रास खुरसफाई किटचे वाटप करण्यात आले. नियमित खुरसफाईमुळे खुरांचा नैसर्गिक आकार टिकून राहतो, तडे जाणे, सडणे, फोड होणे व काच-खिळे टोचण्याच्या घटना टाळल्या जातात. स्वच्छ व नीट छाटलेले खुर असल्यास गाढव सहज, स्थिर व संतुलितपणे चालू शकते, ज्यामुळे त्याची कार्यक्षमता वाढते. याशिवाय खुराखालील चिखल, दगड व जंतू काढल्याने संक्रमण, सूज व जखमा टाळता येतात. दररोज स्वच्छता आणि दर ६ ते ८ आठवड्यांनी खुर छाटणी करणे हा उत्तम निगेचा भाग मानला जातो. या उपक्रमात सुगाव (ता. देगलूर), आळंदी, बोरगावथडी, आरळी, कोल्हेबोरगाव, गळेगाव व बामणी (ता. बिलोली), सुजलेगाव, कोकलेगाव (ता. नायगाव) येथील अश्वमित्रांनी सहभाग नोंदवला. येथील सैनिकी विद्यालयाच्या अश्वशाळेतील प्रशिक्षक प्रकाश ढोणे यांनी प्रशिक्षण दिले. यावेळी 'धर्मा डाँकी सेंचुअरी' संस्थेचे विश्वस्त अभिजीत महाजन यांनी, या प्रशिक्षणामुळे गाढवांच्या खुरांची निगा अधिक प्रभावीपणे राखली जाईल असा विश्वास व्यक्त केला, तर कृषी विज्ञान केंद्रातील पशुवैद्यक डॉ. निहाल मुल्ला यांनीही महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.



# आईच्या मारेकऱ्यांवरील गुन्ह्यात वाढ करून ॲट्रॉसिटी व मकोका कलमे वाढवावीत

## पाचुंदा दलित महिला दुहेरी हत्याकांडातील मयताच्या मुलांची पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २८ नोव्हेंबर-**

नांदेड जिल्ह्यासह अख्ख्या महाराष्ट्राला हादरवून टाकणाऱ्या माहूर तालुक्यातील पाचुंदा येथील दलीत कुटुंबातील दोन सख्ख्या जावांचे अंगावरील दागिने लुटून,गळा आवळून खून केल्याचे धक्कादायक हत्याकांड प्रकरण २० नोव्हेंबर रोजी घडली. या प्रकरणी दोन आरोपींना जिल्हा पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांनी जलद गतीने तपासाची चक्रे फिरवून स्थानिक गुन्हे शाखा नांदेड व स्थानिक पोलीसांच्या मदतीने काही तासातच अटक केली. परंतु आता या प्रकरणात आणखी एक नविनच ट्विस्ट निर्माण झाले असून,या प्रकरणात

गुन्ह्यात वाढ करून ॲट्रॉसिटी व मकोका कलमे वाढवावीत व खटला जलदगती न्यायालयात चालवून मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी मयत मातांच्या दोन्ही मुलांनी पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



पाचुंदा दुहेरी हत्याकांड प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांनी जलद गतीने तपासाची चक्रे फिरवून काही तासातच दोन्ही आरोपीना अटक केली असल्यामुळे दोन्हीही मयताच्या मुलांनी ऑपरेशन फ्लॅश आउटराबवून गुन्हेगांना हतबल करणाऱ्या पोलीस अधीक्षक अविनाश कुमार,उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे, स्थानिक गुन्हे शाखा नांदेड आणि स्थानिक पोलीस प्रशासनाचे आभार मानले आहेत.

मारेकऱ्यांवर शेतात कापूस वेचणी करत असलेल्या दोन दलीत महिला ज्या आपसात सख्ख्या जावा होत्या त्यांच्या अंगावरील जबरीने दागिने लूटने आणि खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत ह्या दोघी सख्या जावा असून दलित प्रवर्गातील असल्यामुळे व मारेकरी जवळच्या गावातील असल्यामुळे,घटनेच्या साधारणपणे महिनाभरा आधीपासून त्या भागात फिरत असल्याचे दुसऱ्या एका प्रकरणात या प्रकरणाच्या काही दिवस आधी पानोळा येथील एका महिलेस मारहाण करून जबरी दागीने लुटून नेल्याच्या घटनेवरून उघड झाले असून, महत्वाचे म्हणजे शेतात पंचशील ध्वज बांधलेला असल्याने आरोपीना मयताची जात माहित होती. त्यामुळे या गुन्ह्यात वाढ करून ॲट्रॉसिटी व मकोका कलमे वाढवावीत व खटला जलदगती न्यायालयात चालवून मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी,अशी मागणी मयत मातांच्या दोन्ही मुलांनी केली आहे.

अर्जदार मुले नामे नागेंद्र साहेबराव आढागळे व प्रमोद अशोक आढागळे हे २७ नोव्हेंबर रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांना निवेदन देण्यासाठी नांदेड येथे गेले होते. विशेष म्हणजे या संदर्भात महिला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या तालुका अध्यक्षा सौ.नम्रता मनोज किर्तने यांनीही उपविभागीय पोलिस अधिकारी किरण भोंडवे व पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांना भेटून मागणी केली होती.पीडित मुलांसोबत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉ.शंकर सिडाम, राष्ट्रवादी काँग्रेस ( श.प.) पक्षाचे विधानसभा सरचिटणीस मनोज किर्तने, कॉ.प्रसराम पारडे, किरण आडागळे सोबत होते.

मुळचे माहूरचे रहिवासी असलेले माकप जिल्हा सचिव मंडळ सदस्य तथा नांदेड तालुका सचिव कॉ.गंगाधर गायकवाड यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदनातील मागण्या संदर्भात माहिती दिली असून, माहूर उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे माहूर यांना याविषयीची माहिती देऊन गुन्ह्यात वाढ करण्यात यावी अशी विनंती केली. तेव्हा पोलीस अधीक्षकानी या बाबत कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित पोलीस अधिकारी यांना देणार असल्याचे आश्वासन दिले.यावेळी माकप जिल्हा कमिटी सदस्या कॉ.उज्वला पडलवार, तालुका कमिटी सभासद कॉ.जयराज गायकवाड, कॉ.श्याम सरोदे, मजदूर युनियन सभासद कॉ. मंगेश वटेवाड, कॉ.बालाजी पाटील भोसले, कॉ. सोनाजी कांबळे आदींची उपस्थिती होती.

एकंदरीतच पोलीस अधीक्षक यांच्या आश्वासक बोलण्यातून लवकरच गुन्ह्यात वाढ होऊन नांदेड, यवतमाळ जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे काढून दहशत माजवणाऱ्या कायद्याच्या गुन्हेगाराविरुद्ध ॲट्रॉसिटी व मकोका कलमे समाविष्ट होतील व प्रकरण जलदगती न्यायालयात सुरू होईल, अशी अपेक्षा निवेदनकर्त्यांनी व्यक्त केली आहे. अनेक गंभीर प्रकरणातील सराईत गुन्हेगारानी अनेक कुटुंबे उध्वस्त केली आहेत.

पाचोंदा येथील पीडित दलित कुटुंबियांचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले असून पीडितांना दिलासा मिळावा व त्यांना शासकीय मदत मिळावी यासाठी कॉ.शंकर सिडाम,

मनोज किर्तने आणि कॉ.गंगाधर गायकवाड हे प्रयत्नशील असून निवेदन प्रकरणी पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.